PREMIUM QUALITY FOOD IN DHULE
* Dosas * Sandwiches * Pav Bhaji * Pulao * Frankie
* Pizza * Fries * Chopsuey / Noodles * Momos
* Soup * Punjabi / Chinese / Continental * Starters
* Sizzler * Tandoor Starters * Chaap * Thali
Main Course * Juices * Falooda / Milkshakes / Dessert
JAIN FOOD AVAILABLE FREE HOME DELIVERY
B'Live ® Delightful delicacies! SPACE FOR KITTY / BIRTHDAY PARTY
B'Live Restaurant Also available on zomato SWIGGY
Below Card House, Lane No.5, Near Sonya Maruti, Dhule
9423928900 / 9307868768

# आपला महाराष्ट्र

मूल्य २.०० | संस्थापक - लोकमित्र भाई मदाने | WWW.APLAMAHARASHTRA.IN

संयुक्त वर्ष ६९ ■ अंक क्र.३२९ ■ मंगळवार १ सप्टेंबर २०२६ ■ धुळे, नंदुरबार, जळगाव, नाशिक आवृत्ती ■ पाने ४

POST REGD.No./DHL/53/24-26

बॉम्बे चष्माघर
गल्ली नं.५, पारोळारोड कॉर्नर, धुळे
फोन : 235222, मो.9021853108

# देशातील सहा रेल्वेमार्ग खासगी कंपन्यांकडे चाळीस हजार आठशे सहासष्ट कोटींचा खर्च

नवी दिल्ली, दि. ३१ : देशातील रेल्वे पायाभूत सुविधांच्या विकासात आता खासगी कंपन्यांचा सहभाग वाढणार आहे. भारतीय रेल्वेने निश्चित केलेले सहा रेल्वे मार्ग हायब्रीड अ‍ॅन्युइटी मॉडेलअंतर्गत खासगी कंपन्यांच्या सहभागातून विकसित करण्याच्या प्रस्तावाला केंद्रीय अर्थ मंत्रालयाच्या सार्वजनिक-खासगी भागीदारी मूल्यांकन समितीने (पीपीपीएसी) मंजुरी दिली आहे. या सहा मार्गांची एकूण लांबी सुमारे ६४७ किलोमीटर असून, रा प्रकल्पाचा अंदाजित खर्च पंधरा हजार ९७६ कोटी रुपये आहे. या प्रकल्पांतर्गत रेल्वे मार्गांची उभारणी खासगी कंपन्यांकडून करण्यात येणार असली तरी भारतीय रेल्वेचा काही त्यात आर्थिक सहभाग राहणार आहे. प्रकल्पाच्या खर्चात खासगी कंपन्यांचा साठ टक्के, तर रेल्वेचा चाळीस टक्के वाटा असेल. संपूर्ण सवलत कालावधीचा विचार केल्यास या प्रकल्पांचा एकूण भांडवली खर्च सुमारे चाळीस हजार ८६६ कोटी रुपये होण्याचा अंदाज आहे.



**सहा मार्गांपैकी चार ओडिशात**

प्राप्त माहितीनुसार, प्रस्तावित सहा रेल्वे मार्गांपैकी चार मार्ग ओडिशामध्ये, एक तेलंगणामध्ये आणि एक झारखंडमध्ये आहे. या मार्गांचा प्रामुख्याने मालवाहतुकीसाठी वापर केला जाणार आहे. कोळसा, लोहखनिज, बॉक्साईट, कोक, रासायनिक खते, सिमेंट तसेच काही धान्यांची वाहतूक या मार्गांवरून होण्याची शक्यता आहे.

**मंत्रीमंडळात निविदेचा निर्णय**

पीपीपीएसीच्या मंजुरीनंतर हा प्रस्ताव आता केंद्रीय मंत्रीमंडळाच्या अंतिम मंजुरीसाठी पाठविला जाणार आहे. मंत्रीमंडळाची मंजुरी मिळाल्यानंतर संबंधित प्रकल्पांसाठी निविदा प्रक्रिया सुरू केली जाईल. सार्वजनिक-खासगी भागीदारीच्या माध्यमातून नवीन रेल्वे मार्ग विकसित करण्याचा हा महत्त्वपूर्ण आणि देशातील पहिलाच (पान ४ वर)

## सीजेपीच्या मोर्चावर बंदीस सर्वोच्च न्यायालयाचा नकार

नवी दिल्ली, दि. ३१ : राजधानीत पाच सप्टेंबरला प्रस्तावीत असलेल्या कॉकरोच जनता पार्टी (सीजेपी) च्या मोर्चावर बंदी घालण्यास सर्वोच्च न्यायालयाने नकार दिला आहे. या मोर्चामुळे कोणतीही अप्रिय घटना घडण्याची शक्यता असल्याचे ठोस कारण सध्या दिसत नसल्याचे न्यायालयाने स्पष्ट केले. सरन्यायाधीश सूर्यकांत यांनी प्रशासनाने कायदा आणि सुव्यवस्था राखावी, तसेच मोर्चात सहभागी होणाऱ्या सर्व पक्षांनी जबाबदारीने आणि कायद्याच्या चौकटीत राहून काम करावे, अशी अपेक्षा व्यक्त केली. या मोर्चावर बंदी घालण्याची मागणी करणारी याचिका निवृत्त दिल्ली पोलीस अधिकारी राजेंद्र सिंह यांनी दाखल केली होती. दिल्लीत होणाऱ्या (पान ४ वर)

# व्यापारी संकुलांचा भाडे आकारणी प्रश्न गाजला मनपा अधिकारी अनुत्तरीत; आयुक्तांनी धरले धारेवर

**धुळे, दि.३१- महापालिकेच्या मालकीचे मुदत संपलेल्या व्यापारी संकूलाच्या भाडेपट्टा निश्चित करणे, नुतनीकरण व हस्तांतरण, भाडे आकरणीच्या विषय क्र.४५ महासभेत चर्चेसाठी येताच नगरसेवक सुनिल बैसाणे यांनी प्रशासनासमोर प्रश्नांची सरबत्ती केली. अधिकारी व्यवस्थित उत्तरे देण्यात समर्थ दिसू लागल्याने आयुक्त नितीन कापडणीस यांनी अधिकाऱ्यांना चांगलेच धारेवर धरले. पंधरा दिवसांत चौकशी करण्याचे निर्देशही दिले. तसेच अधिकारी उत्तरे देवू शकत नाही ही शरमेची बाब आहे. पुर्वतयारीनिशी महासभेत बोलावे असे खडे बोलही सुनावले.**



भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी सभागृहात घेण्यात आलेल्या महासभा महापौर मायादेवी परदेशी यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आली. यावेळी आयुक्त नितीन कापडणीस उपमहापौर ज्योत्सना पाटील, उपायुक्त मनोज मोरे यांच्यासह महापालिकेतील अनेक सदस्य, विविध विभागातील अधिकारी उपस्थित होते. महासभेसमोर एकुण २८ विषय मांडण्यात आले त्यापैकी ११ विषय नामकरणाचे असल्याने (पान ४ वर)

# गुटखा, अमली पदार्थांचे रॅकेट कधी उध्वस्त करणार? शिवसेना उबाठाचे जिल्हा पोलीस अधीक्षकांना निवेदन

**धुळे, दि.३१- शहरासह जिल्ह्यातील विविध तालुक्यांमध्ये गुटखा, सुगंधित तंबाखू, मावा व इतर प्रतिबंधित/व्यसनजन्य पदार्थांची अवैध तस्करी, साठवणूक व विक्री मोठ्या प्रमाणावर सुरू असल्याच्या नागरिकांच्या तक्रारी सातत्याने समोर येत आहेत.या अवैध व्यवसायामुळे केवळ कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होत नाही, तर तरुण पिढीच्या आरोग्यावर आणि कुटुंबांच्या आर्थिक व सामाजिक जीवनावर गंभीर परिणाम होत आहे. गुटखा, अमली पदार्थांचे रॅकेट कधी उध्वस्त करणार? असा प्रश्न शिवसेना उबाठाच्या पदाधिकाऱ्यांनी जिल्हा पोलीस अधीक्षकांना निवेदनाद्वारे केला आहे.**



निवेदनात नमुद केले आहे की, गुटखा व तंबाखूजन्य पदार्थांच्या सेवनामुळे तोंडाचा कर्करोग, ओरल सबम्युकोस फायब्रोसिस, तोंडाची हालचाल व उघडण्याची क्षमता कमी होणे तसेच हृदय व रक्तवाहिन्यासंबंधी गंभीर आजारांचा धोका वाढतो. त्यामुळे हा प्रश्न केवळ अवैध धंद्यांचा नसून सार्वजनिक आरोग्य आणि तरुणांच्या भवितव्याचा प्रश्न आहे. गुटखा व प्रतिबंधित तंबाखूजन्य पदार्थांविरोधात वेळोवेळी कारवाया होत असल्या, तरी अवैध (पान ४ वर)

## शिरपूर विधानसभा प्रारूप मतदार यादी प्रसिद्ध

शिरपूर दि.३१ (का.प्र.)- भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार राबविण्यात येत असलेल्या विशेष सखोल पुनरीक्षण कार्यक्रम (२०२६) अंतर्गत ०९-शिरपूर (अ.ज.) विधानसभा मतदारसंघाची प्रारूप मतदार यादी ३१ ऑगस्टला प्रसिद्ध करण्यात आली आहे, अशी माहिती प्रांताधिकारी तथा मतदार नोंदणी अधिकारी डॉ. शरद मंडलिक आणि तहसीलदार महेंद्र माळी यांनी दिली.

एसआयआर-२०२६ अंतर्गत १ ऑक्टोबर २०२६ ही अर्हता दिनांक धरून मतदार यादीचे सखोल पुनरीक्षण करण्यात आले आहे. या प्रक्रियेनंतर शिरपूर विधानसभा मतदारसंघातील मतदान केंद्रांची संख्या ३३६ वरून ३४० इतकी झाली आहे. पूर्वीच्या मतदार (पान ४ वर)

### तीस सप्टेंबरपर्यंत हरकत नोंदवता येणार

# एसआरआर मध्ये फॉर्म नाही, डिजिटारझेशन नसल्यामुळे दोन कोटी सात लाख मतदारांची नावे वगळण्यात आली

**मुंबई, दि. ३१ : महाराष्ट्रातील मतदार यादीच्या विशेष सखोल पुनरिक्षणाची (एसआयआर) प्रारूप मतदार यादी आज (दि.३१) प्रसिद्ध करण्यात आली. या प्रारूप यादीतून राज्यातील तब्बल दोन कोटी कोटी सात लाख मतदारांची नावे वगळली गेली आहेत. घरोघरी पडताळणी दरम्यान फॉर्म जमा न होणे, माहितीचे डिजिटायझेशन न होणे तसेच विविध तांत्रिक कारणांमुळे अनेक मतदारांची नावे प्रारूप यादीत येऊ शकलेली नाहीत. पुनरिक्षण प्रक्रिरेत पत्त्यावर आढळून न आलेले मतदार, स्थलांतरीत नागरिक, मृत व्यक्ती, परदेशात स्थायिक झालेले नागरिक तसेच दुबार नोंद असलेले मतदार यांची नावेही प्रारूप यादीतून वगळण्यात आली आहेत.**




निवडणूक आयोगाकडून एसआयआर प्रक्रियेदरम्यान घरोघरी जाऊन मतदारांची पडताळणी करण्यात आली. या प्रक्रियेत काही मतदारांचे फॉर्म उपलब्ध झाले नाहीत किंवा त्यांची माहिती वेळेत डिजिटायझेशन करता आली नाही. त्यामुळे अशा मतदारांची नावे प्रारूप मतदार यादीत समाविष्ट करण्यात आलेली नाहीत. महाराष्ट्राप्रमाणेच दिल्लीमध्येही एसआयआरच्या प्रक्रियेत मोठ्या प्रमाणावर मतदारांची नावे प्रारूप यादीतून वगळण्यात आली आहेत. दिल्लीतील एकूण एक कोटी ४५ लाख नोंदणीकृत मतदारांपैकी ४७ लाख ५६ हजार ७२२ मतदारांची नावे प्रारूप यादीत नसल्याचे सांगण्यात आले आहे. तर सुमारे ९७ लाख ५३ हजार ५०७ मतदारांची माहिती डिजिटायझेशन करण्यात आली आहे. (पान ४ वर)

## हमाल कामगार सह. पतपेढीची सभा संपन्न

धुळे, दि.३१- हमाल कामगार सहकारी पतपेढी मर्यादित, धुळे (मार्केट यार्ड) या संस्थेची २५ वी वार्षिक सर्वसाधारण सभा रविवार दि. ३०/०८/२०२६ रोजी सकाळी १० वाजता रायबा गार्डन, विंचूर, ता. जि. धुळे येथे संस्थेचे चेअरमन गंगाधर कोळेकर यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली.

सभेस हमाल कामगार पतसंस्थेचे सर्व सभासद उपस्थित राहून अजेंड्यावरील सर्व विषयांना सभासदांनी एकमताने मंजुरी दिली व सभा खेळीमेळीच्या वातावरणात संपन्न झाली. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून कृषी उत्पन्न बाजार समितीचे चेअरमन, व्हा. चेअरमन, सचिव व राष्ट्रीय माथाडी संघाचे अध्यक्ष, चंद्रकांत धात्रक, माथाडी मंडळाचे विशाल महाजन व पतसंस्थेचे चेअरमन गंगाधर कोळेकर, सचिव भागवत (पान ४ वर)



# अतिदुर्गम भागात गांजाची शेती उध्वस्त साडे ब्याऐंशी लाख रूपयांचा गांजा जप्त

**शिरपूर दि.३१ (का.प्र.) : तालुक्यातील अतिदुर्गम चिलारे परिसरात वनविभागाच्या जमिनीवर सुरू असलेल्या गांजा शेतीवर शिरपूर तालुका पोलिसांनी छापा टाकून तब्बल ३३० किलो गांजासदृश अंमली पदार्थ जप्त केला. या मुद्देमालाची किंमत सुमारे ८२ लाख ५० हजार रुपये असल्याची माहिती पोलिसांनी दिली.**

पोलीस निरीक्षक जयपाल हिरे, प्रभारी अधिकारी शिरपूर शहर पोलीस ठाणे यांना मिळालेल्या गोपनीय माहितीच्या आधारे ३० ऑगस्टला ही कारवाई करण्यात आली. चिलारे परिसरातील वनविभागाच्या जमिनीवर संशयित शिलदार कालुसिंग पावरा व दीपक अभिमान पावरायांनी कापूस व तुरीच्या पिकामध्ये मानवी शरीरावर विपरीत परिणाम करणाऱ्या गांजाच्या वनस्पतीची लागवड केल्याचे पोलिसांच्या निदर्शनास आले.

कारवाईदरम्यान दोन शासकीय पंच, वजनकाटाधारक, फोटोग्राफर तसेच राजपत्रित अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत (पान ४ वर)

# साक्रीत रस्त्यांसाठी उपोषणकर्त्यांचे जेलभरो लेखी आश्वासनानंतर आंदोलन घेतले मागे

**साक्री, दि.३१ (प्रतिनिधी)- तालुक्यातील खड्डेमय व दयनीय झालेल्या रस्त्यांच्या तातडीने दुरुस्तीच्या मागणीसाठी गेल्या तीन दिवसांपासून तहसील कार्यालयासमोर अ‍ॅड. युवराज तोरवणे यांच्या नेतृत्वाखाली सुरू असलेल्या बेमुदत उपोषण अखेर लेखी आश्वासनानंतर मागे घेण्यात आले.**

जिल्हा बांधकाम विभागाच्या अधीक्षक अभियंत्यांसह संबंधित तालुकास्तरीय अधिकाऱ्यांशी चर्चा होऊन रस्ते दुरुस्तीबाबत ठोस लेखी आश्वासन मिळाल्यानंतर आंदोलन मागे घेण्यात आले.



साक्री तालुक्यातील ग्रामीण भागातील अनेक रस्त्यांची अवस्था अत्यंत खड्डेमय झाली असून नागरिक,विद्यार्थी,शेतकरी व वाहनचालकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे.या रस्त्ये,पुलांची तातडीने दुरुस्ती करण्यात यावी.या प्रमुख मागणीसाठी तहसील कार्यालयासमोर बेमुदत उपोषण सुरू करण्यात आले आहे. आंदोलनाच्या (पान ४ वर)

**धुळे, दि. ३१ (प्रतिनिधी) : धुळे-नंदुरबार जिल्हा सरकारी नोकरांची सहकारी बँक अर्थात ग. स. बँकेच्या संचालक मंडळाच्या सोळा जागांसाठी झालेल्या निवडणुकीत निशांत रंधे यांच्या नेतृत्वाखालील लोकमान्य पॅनेलने सर्व जागांवर विजय मिळविला. माघारी अंती संचालक मंडळाच्या पाच जागांवर लोकमान्य पॅनेलचे उमेदवार बिनविरोध विजयी झाले होते. विरोधकांना केवळ तीन जागांवर उमेदवार देता आले होते. त्यातील एकालाही यश मिळाले नाही. एकतर्फी झालेल्या या निवडणूकीची मतमोजणी धुळ्यातील अग्रवाल विश्राम भवनाच्या आवारात झाली. बँकेसाठी रविवारी २२ मतदान केंद्रांवर सुमारे ५२ टक्के मतदान झाले होते.**



# ग.स. बँक निवडणूकीत सर्व जागांवर लोकमान्य पॅनेलचे उमेदवार विजयी

ग. स. बँकेचे कार्यक्षेत्र धुळे, नंदुरबार, जळगाव, नाशिक आणि अहिल्यानगर असे आहे. त्यामुळे या पाच जिल्ह्यात बँकेच्या शाखा असलेल्या २२ ठिकाणी मतदान झाले. बँकेच्या शाखा असलेल्या ठिकाणी मतदान घेण्यात आले. धुळे शहरातील तीन केंद्रांसह शिरपूर दोन, साक्री दोन, शिंदखेडा, दोंडाईचा, पिंपळनेर, नंदुरबार, शहादा, धडगाव, तळोदा, अक्कलकुवा, नवापूर, जळगाव, अमळनेर, चाळीसगाव, कोपरगाव आणि नाशिक येथील मतदान केंद्रांचा त्यात समावेश होता. बँकेच्या एकूण सहा हजार ४०३ मतदारांपैकी तीन हजार ३४३ मतदारांनी मतदान केले होते. त्यात ५४७ महिला मतदारांचा समावेश होता. संचालक मंडळाच्या निवडणूकीत माघारीअंती पाच जागांवरील (पान ४ वर)

## शिंदखेडा तालुक्यात एटीएम फोडण्याचा प्रयत्न असफल

धुळे, दि.३१- शिंदखेडा तालुक्यात गेल्या काही दिवसांपासून एटीएम वर चोरट्यांची नजर असून तेच टार्गेट करीत आहेत. पाटण (ता.शिंदखेडा) येथील बँकेच्या एटीएममध्ये गॅस कटरच्या साहाय्याने चोरीचा प्रयत्न झाला. रविवारी (ता.३० ऑगस्ट) पहाटे घटना घडली.

या प्रकरणी शिंदखेडा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला. बँकेचे शाखा व्यवस्थापक अन्वर रजा खान (३७) यांनी यासंदर्भात पोलिसांत तक्रार दिली आहे. रविवारी पहाटे साडेचारच्या सुमारास वाजता पांढरा शर्ट, नारंगी स्कार्फ घातलेले दोन जण व कारमधील त्यांच्या साथीदारांनी पाटण येथील बँकेच्या एटीएम गॅस कटरने कापले. त्यातील रोकड काढण्याचा प्रयत्न केला परंतु त्यात ते अपयशी ठरले. एटीएमचा डिस्प्ले, दरवाजासह अन्य नुकसान झाले. या प्रकरणी शिंदखेडा पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाला. दरम्यान नरडाणा येथील एटीएम फोडून बारा लाखांची रोकड चोरट्याने नेली. त्यानंतर शिंदखेडा तालुक्यातील ही दुसरी घटना आहे.

# अनाथ मुलांना मुख्य प्रवाहात आणणाऱ्या वंदना तोरवणेंना होळकर पुरस्कार

**नंदुरबार, दि.३१ (प्रतिनिधी)- पालकांचे छत्र हरपलेल्या अनाथ मुला-मुलींना शिक्षणाच्या माध्यमातून समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी तसेच आदिवासी दुर्गम भागातील महिलांच्या समस्या सोडविण्यासाठी सातत्याने कार्य करणाऱ्या तळोदा येथील वंदना रामदास तोरवणे यांना राज्य शासनाचा सन २०२२-२३ या वर्षाचा पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर पुरस्कार जाहीर झाला आहे.**

वंदना तोरवणे या तळोदा येथील दावलशा बाबा संचलित निवासी शाळेचे कार्य पाहतात. पालक नसलेल्या आणि अनाथ मुला-मुलींना त्यांनी मोठ्या जिद्दीने या निवासी शाळेत प्रवेश मिळवून दिला. शिक्षण, संस्कार आणि सुरक्षित वातावरणाच्या माध्यमातून या मुलांना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी त्यांनी विशेष प्रयत्न केले आहेत.

त्यांचे कार्य केवळ शालेय शिक्षणापुरते मर्यादित राहिले नाही. अनाथ आणि वंचित विद्यार्थ्यांनी बारावीपर्यंत शिक्षण पूर्ण केल्यानंतर त्यांना पुढील उच्च शिक्षणाच्या संधी मिळाव्यात, यासाठीही त्यांनी पुढाकार घेतला. बारावीनंतर अनेक विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणासाठी मुंबई येथे पाठवून त्यांच्या पुढील शिक्षणाची व्यवस्था करण्यासाठी त्यांनी प्रयतक केले. त्यांच्या या प्रयतकांमुळे अनेक विद्यार्थ्यांना उच्च शिक्षण घेता आले असून, पुढे विविध क्षेत्रांत मोठ्या पदांवर नोकरीच्या संधी मिळाल्या आहेत. त्यामुळे वंदना तोरवणे यांच्या कार्याला केवळ शिक्षण नव्हे, तर विद्यार्थ्यांच्या स्वावलंबी भवितव्याला दिशा देणारे कार्य म्हणूनही पाहिले जाते.

विशेषतः धडगाव, अक्कलकुवा, तळोदा व शहादा परिसरातील आदिवासी दुर्गम पाडे आणि गावांमध्ये त्यांनी महिलांच्या विविध समस्या (पान ४ वर)

## ३० वी पुण्यतिथी



**स्व. श्रीमती सुगनबाई वालचंद चौधरी**
(स्वर्गवास: श्रावण वद्य पंचमी १/९/९६)
'नवकार' मंत्रावर अनन्यभक्ती, शुध्द + श्रध्दा अंतरी।
मेणाहुनी मऊ कोमल स्पर्शी स्त्रवितात स्नेहधारा अंतरी।।
तव स्मरण आम्हा आदर्शवत सतत स्फूर्तीदायी।
तव प्रेरणा चैतन्य तसे कर्तव्य ठसू दे आमच्या ठायी।।
उत्तुंग झेप घेवू उंचच भरारी असू द्या शिरी आशिर्वाद।
ऐश्वर्य आनंदाच्या गोकुळास असू द्या तुमच्या पुण्याईची साथ।।
अध्यात्म्याचे तेज लेवून आज प्रभूचरणी, अनंतात विलीन।
आत्म्यास शांती लाभो, हीच प्रार्थना, तुझ्या चरणी लीन।।
**श्री. कांतीलाल, जयंतीलाल, राजेंद्र**
**समस्त चोरडीया परिवार (चौधरी), धुळे.**
फर्म: महात्माजी हॉटेल अ‍ॅण्ड दुग्धालय, धुळे.

**दिपक ज्वेलर्स**
सोने- 22 K -1,45,400 रु.+3% GST
सोने- 24 K -1,58,000 रु.+3% GST
चांदी- 2,44,000 रु.+3% GST
तारगल्ली, सराफ बाजार, धुळे
फोन नं.२३३१०३/२३४१०३

# ग्रा.पं.अधिकारी व सरपंचांबाबत रील्स प्रसारित करणाऱ्यांवर कारवाईची मागणी



**नवापूर, दि.३१ (प्रतिनिधी)- नवापूर तालुक्यातील सरपंचांच्या वतीने सोशल मीडिया, विशेषतः इन्स्टाग्रामवर ग्रामपंचायत अधिकारी व सरपंच यांच्याविषयी चुकीची माहिती, अफवा व दिशाभूल करणाऱ्या रील्स प्रसारित करणाऱ्यांवर कायदेशीर कारवाई करण्याची मागणी करण्यात आली आहे. याबाबतचे निवेदन नवापूरचे तहसीलदार दत्तात्रय जाधव यांच्या मार्फत नंदुरबार जिल्हाधिकारी यांना देण्यात आले.**

निवेदनात म्हटले आहे की, सध्या सोशल मीडियावर काही ग्रुप अ‍ॅडमिन व संबंधित व्यक्ती कोणतीही सविस्तर माहिती किंवा कागदपत्रांची (पान ४ वर)

## हार्दिक अभिष्टचिंतन !



**श्री.कुणाल शेठ चौधरी**
यांना वाढदिवसाच्या
**हार्दिक शुभेच्छा**
- शुभेच्छुक -

| | |
|---|---|
| मुबारक पिंजारी | प्रमोद जोशी |
| चेतन पाटील | सोनुभाऊ अहिरे |
| राजु सर पाटील | राकेश मोरे |
| गुलाब पाटील | सुनिल पाटील |
| गोपीचंद पाटील | गणेश पाटील |
| शरद कुंवर | प्रविण भामरे |
| संजू शेरसिंग | संदिप पावरा |
| कैलास पावरा | पिंटू पावरा |

# आपला महाराष्ट्र

## नेपाळ : पुन:पुन्हा उध्वस्त होणारा गरीब देश

नागालँड मधील पावसाचा तडाखा आसामला बसला. महापुरामुळे आसाम मधील काही जिल्हे उध्वस्त झाले आहेत. गावेच्या गावे संपून गेली. घरे वाहून गेली. त्यामुळे खायला काही नाही अशी अवस्था निर्माण झाली आहे. मुलांना शाळेत पाठवायचे तर दप्तर नाही. थंडी वाढल्यामुळे पांघरूण काही नाही अशा बिकट परिस्थितीत आसामला मदतीची आवश्यकता आहे. तिथले सरकार आणि देशातील इतर विधायक संघटनांनी मिळून पूरग्रस्त आसामी जनतेला दिलासा देण्याचा प्रयत्न केलेला आहे. आसाम मधील पूरस्थिती आणि जनजीवन पूर्वपदावर येत असतानाच भारताच्या शेजारील नेपाळमध्ये घोटेकोशी नदीच्या महापुराने तेथील जनजीवन उध्वस्त झाले आहे. हिम नदीचा काही भाग कोसळल्यानंतर महापूर आला. हिमनदीच्या खालील खडक उध्वस्त होऊन कोसळले त्यामुळे त्या नदीचा काही भागही खाली आला त्याची तीव्रता मोठ्या भूकंपा इतकीच होती त्यामुळे नुकसानीचा अंदाज लगेचच बांधता येणार नाही. नेपाळी लोक उध्वस्त झालेल्या घरातील सामान सुमान जुळवून पुनश्च जगण्याची वाट प्रशस्त करताना दिसत आहेत. भारतीय पर्यटक मोठ्या प्रमाणावर बेपत्ता झाले परंतु त्यापैकी बरेचसे देशात परतले आहेत. त्यात महाराष्ट्रातील पर्यटकांचा समावेश होता. त्यांची सरकारने वास्तपुस्त करून स्वगृही सुखरूप परत आणले आहे.

नेपाळची राजधानी काठमांडू येथे नुकसानीचे सर्वाधिक प्रमाण आहे. या पुराचा फटका तिबेटलाही बसला असून २५० हून अधिक पर्यटक बेपत्ता झालेले आहेत. पर्वतारोहण करणारे हौशी पर्यटक, धार्मिक यात्रा करण्यासाठी आलेले भक्त बरेचसे बेपत्ता आहेत. त्यांचा शोध सुरू आहे. सुमारे हजार लोक मृत्यूमुखी पडले. अडीच हजाराहून अधिक बेपत्ता आहेत. मृतांचा आकडा आणखी वाढण्याची शक्यता आहे. छोटे छोटे साकव उध्वस्त झाल्यामुळे गावांचा एकमेकांशी असलेला संपर्क तुटला असून तात्पुरत्या निवाऱ्यात लोकांची रवानगी करण्यात आली आहे. अशाप्रकारे देशातील राज्यात आणि शेजारी देशात निसर्गाने थैमान घातलेले असताना आपल्याला उज्वेकिस्तानचा सर्वोच्च पुरस्कार मिळतो आणि तो स्वीकारण्याचा आनंद आपण साजरा करतो अशा प्रकारची दुःख आणि आनंदाची संमिश्र प्रतिक्रिया देशात उमटली आहे. नेपाळ यापूर्वी भूकंपात उध्वस्त झाला होता. काठमांडू साधारणपणे सहा ते सात महिने सावरला नव्हता. तो सावरून जनजीवन सामान्य झालेले असताना काहीच वर्षात पुराचा तडाखा या देशाला बसला आहे. नेपाळची रचना निसर्गतः अवघड आहे. एव्हरेस्ट आणि कंचनजंगा यासारखी हिमालयातील उंच उंच लहान मोठी शिखरे, त्यातून वाहणाऱ्या घोटेकोशी आणि बागमती सारख्या नद्या अरुंद आणि खोल दऱ्यां मधून मार्ग काढत जातात. महापुरामुळे त्या अनियंत्रित होतात. आणि काठावरचे जनजीवन उध्वस्त करतात. या नद्यांच्या पुराचे आणि उद्ध्वस्त होणाऱ्या पुलांचे काही व्हिडिओ सोशल मीडिया वरून प्रसारित झाल्यामुळे या संकटाची तीव्रता जाणवली. ती लक्षात घेऊन महाराष्ट्रातील काही शहरांमधून नेपाळला मदत करण्याच्या दृष्टीने मदत फेऱ्या काढण्यात आल्या. मानवीय भूमिकेतून ही मोहीम चालविण्यात आली. त्यास बऱ्यापैकी प्रतिसाद मिळतो आहे. सर्वत्र हिमालय पसरलेला असल्यामुळे भारतीय पर्यटकांना तो सतत खुणावत असतो. काठमांडूत पशुपतिनाथाचे मंदिर आहे. त्यामुळे चारधाम करणाऱ्या भक्तांसाठी पशुपती नाथाचे दर्शन ही एक पर्वणी असते. त्यासाठी नेपाळमध्ये जाऊन आलेल्या लोकांना नेपाळ कसा आहे ते लक्षात येते. घरे बहुदा डोंगरातच वसलेली असतात. कारण सखल भाग उपलब्ध नाही. त्यातल्या त्यात काठमांडूत काही भाग सखल असल्यामुळे त्या शहराची रचना करण्यात आलेली दिसते.

बहुतेक नद्या चीन मधून येतात हिमाचल प्रदेशातून त्या भारतात येतात. काही नेपाळमधून येतात. त्यामुळे चीनमधील पावसाचा अपरिहार्य परिणाम दोन्ही देशांवर होतो. लाहुली आणि स्पिती नद्या सतत पावसाळ्यात रस्ते उध्वस्त करतात. भूस्खलनाचे प्रमाण या भागात अधिक असते. तसेच ते नेपाळमध्ये देखील असते. जागतिक हवामान बदलाचा परिणामही हिमालयात झालेला आहे. मानवी हस्तक्षेपामुळे हिमालय आणि तेथील जनजीवन सुरक्षित राहिलेले नाही. म्हणूनच हिमनद्या वितळतात. आणि पावसाळ्या व्यतिरिक्त देखील या नद्यांना पूर येतात. उत्तराखंड, हिमाचल प्रदेश, जम्मू कश्मीर या प्रदेशात तापमान वाढत असल्यामुळे ग्लेशियर वितळण्याचे प्रमाण वाढलेले आहे. त्यामुळे वाहतूक बंद होणे आणि पूर येणे असे प्रसंग सतत चालू असतात. अशा परिस्थितीत धोरणकर्ते नैसर्गिक परिस्थितीचा विचार न करता नव विकासाचा ध्यास घेत डोंगर पोखरून त्यातील जंगले तोडून, बोगदे तयार करून रस्ते प्रशस्त करतात. वास्तविक या प्रदेशांमध्ये जी परिस्थिती आहे ती कायम ठेवून विकासाची संकल्पना राबविण्यात आली पाहिजे. परंतु अधिकाधिक पर्यटन आणि झगमगाट, पैसा कमावण्याची स्पर्धा यामुळे निसर्ग संपवून टाकण्याचे दुष्टचक्र सुरू आहे. जगातील देशादेशात हवामान विषयक परिषदा होतात, करार होतात. सामुदायिक ठराव होतात. त्याद्वारे निसर्गाचे संवर्धन करण्याची प्रतिज्ञा घेतली जाते. परंतु त्याकडे पूर्णतः दुर्लक्ष करून आपल्या देशात उध्वस्तीकरणाचे उद्योग सुरू आहेत

मोठ्या भांडवलदारांना मोठमोठी जंगले सहजपणे विकासासाठी किंवा कारखानदारीसाठी हस्तांतरित करण्यात येत आहेत. यातून मानवी जीवन धोक्यात येणार असून पुढील काळात जर या संदर्भात सर्वसमावेशक असे निर्णय घेतले नाहीत तर पुढच्या पिढ्या विकृत जन्माला येतील. आणि त्यांना निसर्गाची व्याख्याही कळणार नाही. त्यांचे भवितव्य जर उज्वल ठेवायचे असेल तर निसर्गाचा ठेवा जतन केला गेला पाहिजे. गांधीजींनी माणसाच्या हव्यासावर अचूक भाष्य केलेले आहे. ही पृथ्वी सर्वांच्या गरजा भागवण्याची क्षमता बाळगून आहे. परंतु कुणा एकाचा हव्यास पूर्ण करण्याची क्षमता तिच्यात नाही. यात पर्यावरण रक्षण आणि विकासाच्या संकल्पना काय असाव्यात असा व्यापक अर्थ सामावलेला आहे.नेपाळ आणि हिमालयातील आपत्तींकडे केवळ एखाद्या देशापुरती किंवा एखाद्या पुरापुरती घटना म्हणून पाहणे योग्य ठरणार नाही. त्यामागे व्यापक पर्यावरणीय बदलांचे संकेत आहेत. हिमालयाच्या परिसरात हवामान बदलाचे परिणाम अधिक तीव्रतेने जाणवत आहेत. हिमनद्या वितळण्याचे प्रमाण वाढत आहे, पावसाच्या स्वरूपात बदल होत आहेत आणि अतिवृष्टी, भूस्खलन, पूर यांसारख्या घटनांची पुनरावृत्ती व तीव्रता वाढत असल्याचे दिसते.

उत्तराखंड, हिमाचल प्रदेश, जम्मू-कश्मीर तसेच हिमालयीन प्रदेशातील अनेक भागांत अतिवृष्टी आणि भूस्खलनामुळे रस्ते, पूल आणि वाहतूक व्यवस्था वारंवार बाधित होत आहेत. लाहुल-स्पिती खो-यात पावसाळ्यात रस्ते उद्ध्वस्त होणे आणि भूस्खलन होणे ही गंभीर समस्या बनली आहे. हिमालय हा केवळ पर्यटनाचा प्रदेश नसून तो नद्या, जंगल, हिमनद्या आणि असंख्य लोकांच्या जीवनाचा आधार आहे, हे आपण विसरता कामा नये.

दुर्दैवाने, विकासाच्या नावाखाली आपण याच नैसर्गिक व्यवस्थेवर आघात करीत आहोत. हिमालयासारख्या अतिसंवेदनशील प्रदेशात मैदानी भागासाठी वापरली जाणारी विकासाची पद्धत वापरणे धोकादायक आहे. तेथील भौगोलिक आणि पर्यावरणीय परिस्थिती लक्षात घेऊन विकासाची संकल्पना आखली पाहिजे. निसर्गाची क्षमता किती आहे, डोंगर किती भार सहन करू शकतो, जंगलतोडीचा परिणाम काय होईल, नदीच्या नैसर्गिक प्रवाहात हस्तक्षेप केल्यास काय घडेल, याचा विचार करूनच कोणतेही बांधकाम झाले पाहिजे. जगभर हवामान बदलावर परिषदा होतात, करार केले जातात आणि पर्यावरण संवर्धनाचे संकल्प घेतले जातात. परंतु प्रत्यक्ष कृतीच्या वेळी मात्र आर्थिक वाढ आणि मोठ्या प्रकल्पांना प्राधान्य दिले जाते. मोठमोठी जंगले विकासाच्या किंवा औद्योगिक प्रकल्पांच्या नावाखाली भांडवलदारांच्या हाती देण्याची प्रवृत्ती वाढत असेल, तर त्याची किंमत शेवटी सामान्य माणसालाच मोजावी लागणार आहे. निसर्गाशी केलेली छेडछाड केवळ आजच्या पिढीला त्रास देत नाही; तिचा परिणाम पुढील पिढ्यांवर होतो. आज आपण जंगल नष्ट केले, नद्या प्रदूषित केल्या, पर्वत पोखरले आणि हिमनद्यांच्या नैसर्गिक चक्रात हस्तक्षेप केला, तर उद्याच्या पिढ्यांना सुरक्षित आणि निरोगी पर्यावरण मिळेल याची खात्री कोणीच देऊ शकणार नाही.पुढील पिढ्यांना निसर्ग हा केवळ पुस्तकातील शब्द म्हणून समजण्याची वेळ येऊ नये.आसामचा महापूर असो, नेपाळमधील घोटेकोशीचा प्रलय असो किंवा हिमालयातील वारंवार होणारे भूस्खलन असो निसर्ग आपल्याला वारंवार इशारा देत आहे. प्रश्न एवढाच आहे की आपण तो इशारा ऐकणार आहोत की आणखी मोठ्या आपत्तीची वाट पाहणार आहोत याचा विचार झाला पाहिजे.विकास हवाच आहे पण निसर्गाचा विनाश करून नको आहे.हिमालय, पश्चिम घाट,अरवली विंध्य ,सातपुडा वाचवायचा असेल तर विकासाची व्याख्याच नव्याने करावी लागेल.



### भुपेशभाई पटेलांच्या वाढदिवसाचे औचित्य

## शिरपूर येथे आयुर्वेद आरोग्य तपासणी शिबीर; दोनशे पंच्याहत्तर रुग्णांना लाभ

**शिरपूर, दि.३१- एस.व्ही. के.एम. चे सहअध्यक्ष भूपेशभाई पटेल यांच्या वाढदिवसानिमित्त एस.व्ही. के.एम. संचालित कृतिबेन भूपेशभाई पटेल आयुर्वेद सिटी क्लिनिक, महाराजा कॉम्प्लेक्स, शिरपूर येथे २५ ऑगस्ट रोजी संधिवात व मोफत आयुर्वेद आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले. सकाळी ९ ते दुपारी ३ या वेळेत झालेल्या या शिबिराला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला असून एकूण २७५ रुग्णांनी या शिबिराचा लाभ घेतला.**

शिबिराचे उद्घाटन एस.व्ही. के.एम. चे सहअध्यक्ष भूपेशभाई पटेल व भार्गवभाई पटेल (मुंबई) यांच्या हस्ते भगवान धन्वंतरी पूजन व दीपप्रज्वलन करून करण्यात आले. यावेळी प्रवीण दोशी मुंबई, व्यवस्थापन समिती सदस्य राजगोपाल भंडारी, श्री बालाजी संस्थान उपाध्यक्ष गोपाल भंडारी, अनुज डायमा, आयुर्वेद डायरेक्टर डॉ. कुलदीप कोहली, बाजार समिती सभापती के.डी. पाटील, सुभाष कुलकर्णी आदी मान्यवर उपस्थित होते.

उद्घाटनानंतर डायरेक्टर डॉ. कुलदीप कोहली व डीन डॉ. अजय साळुंखे यांनी उपस्थितांना आयुर्वेद सिटी क्लिनिक मध्ये उपलब्ध असलेल्या विविध आरोग्यसेवा व उपचार सुविधांची माहिती दिली. मान्यवरांनी क्लिनिकमधील बाह्यरुग्ण विभागाची पाहणी करून रुग्णांसाठी उपलब्ध असलेल्या विविध उपचार व आरोग्यसेवांची माहिती घेतली.

शिबिरासाठी जळगाव येथील सहा तज्ज्ञ सल्लागार डॉक्टरांनी विशेष सेवा दिली. यामध्ये डॉ. शर्मिली सूर्यवंशी, डॉ. अनिल वाघ, डॉ. प्रविणकुमार राठोड, डॉ. राहुल चौधरी, डॉ. अनंत पाटील, डॉ. अनुपम दांडगव्हाळ यांचा समावेश होता.

शिबिरात प्रयोगशाळा तपासण्या ५० टक्के सवलतीच्या दरात, आयुर्वेदिक औषधे ३० टक्के सवलतीच्या दरात उपलब्ध करून देण्यात आली. एकूण ५० रुग्णांनी रक्त तपासणी, ३२ रुग्णांनी एक्स-रे, २ रुग्णांनी बीएमडी, ७ रुग्णांनी ईसीजी तपासणीचा लाभ घेतला. तसेच १७६ रुग्णांनी सवलतीच्या दरातील आयुर्वेदिक औषधांचा लाभ घेतला.

रक्त तपासणीसाठी तापनभाई मुकेशभाई पटेल मेमोरियल हॉस्पिटल अँड रिसर्च सेंटर यांचे विशेष सहकार्य लाभले. या माध्यमातून रुग्णांना आवश्यक प्रयोगशाळा निदान सेवा सवलतीच्या दरात उपलब्ध करून देण्यात आल्या.

एस.व्ही.के.एम. अध्यक्ष माजी मंत्री आमदार अमरिशभाई पटेल, सहअध्यक्ष भूपेशभाई पटेल, डॉ. कुलदीप कोहली यांच्या मार्गदर्शनाखाली झालेल्या या शिबिराला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

## शहादा पो.स्टेशनमध्ये रक्षाबंधनाचा कार्यक्रम

शहादा,दि.३१ (प्रतिनिधी)- येथील कै.सौ.जी.एफ.पाटील कनिष्ठ महाविद्यालयाचा राष्ट्रीय सेवा योजना युनिट +२ स्तरच्या नियमित कार्यक्रम अंतर्गत शहादा पोलिस ठाण्यातील कर्मचाऱ्यांना राखी बांधण्यात आली. राष्ट्रीय सेवा योजना ही विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक बांधिलकी, राष्ट्रप्रेम, सेवाभाव, शिस्त आणि सामाजिक जाणीव निर्माण करणारी महत्त्वपूर्ण विद्यार्थी चळवळ आहे. सेवा हीच साधना या भावनेतून स्वयंसेवक विविध सामाजिक उपक्रमांमध्ये सक्रिय सहभाग घेत असतात. राष्ट्रीय सेवा योजना युनिटच्या वतीने रक्षाबंधनानिमित्त पोलीस बांधवांना राखी बांधणे या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. यावेळी शहादा पोलिस स्टेशनचे पोलीस निरीक्षक हेमंतकुमार पाटील, सहाय्यक पोलिस उपनिरिक्षक विनोद पाटील आदी उपस्थित होते.

## गोदावरी विद्यालयात माता पालक सभा

म्हसावद, दि.३१(प्रतिनिधी)- शहादा तालुक्यातील म्हसावद येथील श्री साई बाबा भक्त मंडळ संचालित प.पू.सती गोदावरी माता माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, संत आसाराम बापु प्राथमिक शाळा व यांच्या संयुक्त विद्यमाने माता पालक सभेचे आयोजन करण्यात आले. अध्यक्षस्थानी चेअरमन संजय धारुभाई पाटील, प्रमुख अतिथी नंदुरबार जिल्हा शिक्षण अधिकारी भानुदास रोकडे उपस्थित होते. म्हसावद केंद्राचे केंद्रप्रमुख सुदाम चौधरी, संस्थेचे व्हाईस चेअरमन रमाकांत चौधरी, सचिव प्रसन्नकुमार बंब, व संचालक मंडळ, प्राचार्या पुष्पा पटेल, प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक प्रकाश पाटील, टवळाईचे सरपंच प्रकाश वाघ, तलावडीचे सरपंच हिम्मत पावरा, दराचे सरपंच प्रतिनिधी रणजीत रहासे, पिंप्री येथील सामाजिक कार्यकर्ते जमन ठाकरे, तसेच मोठ्या संख्येने पालक वर्ग उपस्थित होता. उपशिक्षक विनोद ठाकरे यांनी शिक्षणाचे महत्व पटवून दिले. शिक्षणाधिकारी रोकडे यांनी पालकांना संबोधित करत मुलींना उच्च शिक्षणापर्यंत पोहचवावे या बद्दल माहिती दिली. प्रसंगी सभेला पालक वर्ग, विद्यार्थी, शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन भावना गुजर यांनी केले व आभार कल्पना अहिरे यांनी मानले.

## चितोड गावातील वृद्धाची आत्महत्या

धुळे, दि.३१- चितोड येथील वृद्धाने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना घडली. संजय भानुदास गजरे (वय ६२) असे त्यांचे नाव आहे.

काल दुपारी दोनच्या सुमारास बुधवारी दुपारी दोनच्या सुमारास घराच्या छताला रुमालने गळफास घेतल्याचे निदर्शनास आले. घटनेची माहिती मिळताच परिसरातील काहींनी धाव घेतली. त्यांना खाली उतरवून श्री भाऊसाहेब हिरे शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात दाखल केले असता डॉ. बागुल यांनी संजय गजरे यांना मृत घोषित केले. धुळे तालुका पोलीस ठाण्यात रात्री उशिरा आकस्मिक मृत्यूची नोंद झाली.

## हिरे वैद्य.महा.च्या प्रसूती विभागात सुविधा द्या मा.उपमहापौर अंपळकरांचा आंदोलनाचा इशारा



**धुळे, दि.३१- रक्षाबंधनाच्या निमित्ताने नवजात बालकांना भेटवस्तू देण्यासाठी माजी उपमहापौर तथा नगरसेविका सौ. कल्याणी सतीश अंपळकर आणि भाजपा महिला मोर्चा, धुळे महानगरच्या सहकारी कार्यकर्त्यांसह भाऊसाहेब हिरे शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय प्रसूती विभागात गेल्या असता. प्रसूत महिला आणि नवजात बालकांशी संबंधित काही गंभीर त्रुटी त्यांच्या निदर्शनास आल्या. प्रसूतीनंतर महिलांसाठी पुरेशा खाटा उपलब्ध नसणे, स्वच्छतागृहांची अस्वच्छता व दुरवस्था, नवजात बालकांच्या तपासणीची व्यवस्था, अग्निसुरक्षेची स्थिती तसेच रुग्णांना देण्यात येणाऱ्या भोजनाच्या गुणवत्तेबाबत त्यांनी रुग्णालय प्रशासनाचे लक्ष वेधले असून, या प्रश्नांवर तातडीने उपाययोजना करण्यात यावा. अन्यथा आंदोलन करण्याचा इशारा मा.उपमहापौर अंपळकर यांनी दिला आहे.**

रुग्णालयाच्या पाहणीदरम्यान प्रसूतीनंतर दाखल असलेल्या काही महिलांसाठी पुरेशा खाटा उपलब्ध नसल्याची बाब निदर्शनास आली. प्रसूतीनंतरची महिलांची शारीरिक अवस्था लक्षात घेता अशा महिलांना जमिनीवर झोपण्याची वेळ येणे ही गंभीर बाब असल्याचे सौ. कल्याणी अंपळकरांनी प्रशासनाच्या निदर्शनास आणून दिले. रुग्णालयातील उपलब्ध खाटांची संख्या, दररोज दाखल होणाऱ्या रुग्णांची संख्या आणि प्रत्यक्ष गरज यांचा तातडीने आढावा घेऊन आवश्यकतेनुसार खाटांची संख्या वाढवावी, अशी मागणी त्यांनी केली आहे.

रुग्णालयात दररोज मोठ्या संख्येने स्थानिक व बाहेर गावावरुन येणाऱ्या रुग्ण, महिला, नवजात बालके आणि नातेवाईकांची वर्दळ असते. त्यामुळे आग किंवा अन्य आपत्कालीन परिस्थिती उद्भवल्यास रुग्णांना सुरक्षितपणे बाहेर काढण्यासाठी आवश्यक व्यवस्था सज्ज असणे गरजेचे आहे. या पार्श्वभूमीवर संपूर्ण रुग्णालयाचे फायर ऑडिट करून घेण्यात यावे, तसेच अग्निशमन यंत्रणा कार्यरत आहे की नाहीत, आपत्कालीन बाहेर पडण्याचे मार्ग सुस्थितीत आहेत का आणि सुरक्षेच्या दृष्टीने काही त्रुटी असल्यास त्या तातडीने दूर करण्यात याव्यात, अशी मागणी अंपळकरांनी केली आहे. नुकताच अमरावती शासकीय रुग्णालयात लागलेल्या आगीमुळे निष्पाप नवजात बालके मृत्यूमुखी पडलाची घटना ताजी असता फायर ऑडीट संबंधी जागृकता निर्माण होणे आवश्यक आहे.

रक्षाबंधनाच्या निमित्ताने नवजात बालकांना भेटवस्तू देण्यासाठी रुग्णालयात गेलेल्या मा.उपमहापौर अंपळकर यांनी तेथील परिस्थितीची पाहणी केल्यानंतर या बाबींची दखल घेत रुग्णालय प्रशासनाला लेखी निवेदन दिले आहे. महिला आणि नवजात बालकांच्या आरोग्याशी संबंधित बाबींमध्ये कोणताही हलगर्जीपणा होऊ नये, तसेच प्रत्यक्ष पाहणी करून त्रुटी दूर कराव्यात, अशी मागणी त्यांनी केली आहे. या सर्व प्रश्नांवर आठ दिवसांच्या आत ठोस कार्यवाही करून त्याचा लेखी अहवाल उपलब्ध करून द्यावा, निर्धारित मुदतीत आवश्यक सुधारणा न झाल्यास महिला व रुग्णांच्या हक्कांसाठी लोकशाही मार्गाने आंदोलन करण्यात येईल, असा इशाराही उपमहापौर कल्याणी अंपळकर यांनी दिला आहे.

## आर.सी.पटेल फार्मसी महाविद्यालयातर्फे बालकांसाठी आरोग्य जनजागृती शिबिर

**शिरपूर, दि.३१- शिरपूर वरवाडे नगर परिषद संचलित इंदिरा गांधी मेमोरिअल हॉस्पिटलच्या बालरोग विभागात (पेडियाट्रिक वॉर्ड) आर. सी. पटेल फार्मसी महाविद्यालयाच्या इस्पॉर स्टुडन्ट चॅप्टर तर्फे बालकांसाठी आरोग्य जनजागृती शिबिराचे आयोजन करण्यात आले.**



शिबिरादरम्यान रुग्णालयातील बालकांना मोफत प्राथमिक आरोग्यविषयक सल्ला देण्यात आला. तसेच बालकांचे योग्य पोषण, वैयक्तिक स्वच्छता, वेळेवर लसीकरण आणि विविध संसर्गजन्य आजारांपासून बचाव याबाबत उपस्थित पालकांना सविस्तर मार्गदर्शन व समुपदेशन करण्यात आले.बालकांमध्ये उपचाराची भीती कमी व्हावी तसेच त्यांच्या चेहऱ्यावर हास्य फुलावे, या उद्देशाने विविध मनोरंजक खेळ, शैक्षणिक उपक्रम आणि आनंददायी कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. यावेळी बालकांना भेटवस्तूंचे वाटपही करण्यात आले.

बालकांचे आरोग्य सुधारणे, पालकांमध्ये आरोग्यविषयक जागरूकता निर्माण करणे आणि समाजात सकारात्मक आरोग्य संदेश पोहोचवणे, हा या उपक्रमाचा प्रमुख उद्देश होता. या स्तुत्य उपक्रमाबद्दल संस्थेच्या व्यवस्थापन समितीतील सदस्य, मान्यवर तसेच रुग्णालय प्रशासनाने आयोजक विद्यार्थी व मार्गदर्शकांचे कौतुक करून अभिनंदन केले.

या सामाजिक उपक्रमास फार्म डी. विभागप्रमुख प्रा. डॉ. एस.डी. पाटील आणि प्राध्यापक सल्लागार डॉ.पी.आर. देशपांडे यांची प्रमुख उपस्थिती लाभली.तसेच या उपक्रमासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. जे. सुराणा, प्राचार्य डॉ. नितीन हासवाणी, उपप्राचार्य डॉ. ए. ए. शिरखेडकर यांचे बहुमोल मार्गदर्शन लाभले.

## महिला बुद्धिबळ संघ उपविजेता

शहादा,दि.२८(प्रतिनिधी)- कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ जळगाव, तर्फे नंदुरबार विभागाच्या आंतर महाविद्यालयीन महिला बुद्धिबळ स्पर्धा नुकत्याच कला व विज्ञान महाविद्यालय बामखेडा येथे संपन्न झाल्या.

या स्पर्धेत एकूण आठ संघांनी आपला सहभाग नोंदवला होता. स्पर्धेतील अंतिम सामन्यात वसंतराव नाईक कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालयाचा महिला बुद्धिबळ संघ उपविजेता ठरला. या विजयी संघातून कु.चांदणी शेमळे या विद्यार्थीनीची विभाग स्तरावरील स्पर्धेसाठी स्तुत्य निवड झाली. सदर स्पर्धा दि.९ सप्टेंबर रोजी भुसावळ येथे पार पडणार आहेत.

या उपविजेता संघाला महाविद्यालयाचे क्रीडा संचालक प्रा.डॉ.राजेश सोनवणे यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. उपविजयी संघाचे व आंतरविभागीय स्पर्धेसाठी निवड झालेल्या विद्यार्थ्यांनी खेळाडूंचे सातपुडा शिक्षण प्रसारक मंडळ संस्थेचे सचिव प्रा.संजय जाधव, सोनामाई शिक्षण प्रसारक मंडळ संस्थेच्या सचिव व नंदुरबार जिल्हा स्काऊट गाईड आयुक्त वर्षाताई जाधव, प्रशासकीय प्रमुख प्रा.डॉ. हिमांशु जाधव, समन्वयक संजय राजपूत सर, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.डी.डी. राठोड यांनी अभिनंदन केले.

### महिलेची सोनपोत लंपास

धुळे, दि.३१- हट्टी (ता.साक्री) येथील म्हसोबा यात्रोत्सवात महिलेच्या गळ्यातील सोन्याची पोत चोरट्याने लंपास केली. प्रियंका योगेश मासुळे (रा. साक्री) या शनिवारी रात्री यात्रोत्सवात गेल्या होत्या. गर्दीचा फायदा घेत चोरट्याने त्यांच्या गळ्यातील ५४ हजार रुपयांची सोन्याची पोत लंपास केल्याची घटना घडली.

### शब्दकोडे क्रमांक : २४४५



**आडवे शब्द :** १.लोकशाही मार्गाने निवडून देण्यात येणारे एक अति महत्वाचे देशाचे प्रतिनिधित्व करणारे पद ५.धड आणि बाहू यांना जोडणारा सांदा ६.किंतु ८.रानरेडा ९.हेतू १२.गुण १३.हिंदीत-का १४.विचार १५.भारताने सर्वप्रथम अणुचाचणी केलेले ठिकाण १७.अंत १८.फुलाची पंखुडी १९.हिंदीत-पत्र २१.हरणाचे पिल्लू २३.अंगठाच्या विरुद्ध दिशेला असलेले बोट २५.आदिवासी बांधव सादर करतात तो एक प्रसिद्ध नृत्य प्रकार २६.फायदा २७.चेहऱ्यावरील मांसल भाग २८.सच्ची २९.रोकड ३१.विना परवानगी घेतलेली वस्तू,चोरांचे काम ३३.विष ३५.ढीग ३६.एक विदेशी नृत्य प्रकार ३८.खेळातून बाहेर गेलेला ३९.विपुल ४०.साहेब ४१.पक्षांचा राजा ४२.भीमाचे आयुध ४४.वर्तुळ ४५.कदर ४७.एखादे कार्य पूर्णत्वास नेण्यासाठी भगवंताकडे केलेली याचना ४९.हिंदीतील-घास ५०.भार ५२.संगीत सप्तकातील अखेरचा स्वर ५३.कौतुक ५४.तळवा

**उभे शब्द :** १.जेवणावळ २.चपाती भाजण्याचे साधन ३.ठिकाण ५.वासा,बांबू ७.मिश्रण १०.ठिकाण ११.शृंखला १२.मजबूत मनःस्थितीचा १५.भरीव नसलेली निर्वात जागा १६.कडू-विरुद्ध १८.वेडा २०.शोध २१.क्षुल्लक,हलका,अज्ञानी किंवा पापी २३.नमन-उर्दूत २४.रंगकाम करणारा २५.दिनांक ३०.गुणांची कदर करणारा ३१.पक्षांच्या तोंडाजवळील कडक अवयव ३२.फोडणीसाठी वापरतात ते द्रव ३४.धूर्त ३५.दुधापासून बनवले जाते ३६.सावकार, सज्जन किंवा श्रीमंत व्यक्ती ३७.समुद्र ३९.गभ-उलट लिहा ४०.छत्रपती शिवाजी महाराजांचा राज्याभिषेक जिथे पार पडला तो किल्ला ४२.लग्नसमारंभात वधूने हौसेने मांडलेल्या सुंदर कलाकुसरीच्या वस्तू ४५.पापी ४६.अंतरंग ४८.उणे ५१.पाणी

### शब्दकोडे क्रमांक : २४४४ चे उत्तर

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| मि | ळ | क | त | | वा | चा | | म | त | ल | ब |
| ल | | र | ज | त | | व | द | न | | स | ल |
| न | ग | | वी | ज | बी | ल | | न | त | | वा |
| | म | री | ज | | ट | | मां | | क | मा | न |
| हा | | या | | शी | | त | | व | रा | ह | |
| ल | गो | ल | ग | | स | ह | ज | | र | | मे |
| त | ग | | ह | वा | | ल | ब | क | | स | |
| | ल | हा | न | | मौ | का | | पा | ण | व | ठा |
| भं | गा | र | | जा | त | | खो | त | | ल | व |
| | य | | दे | व | | मै | ल | | म | त | |
| ख | | द | | ई | रा | दा | | नीं | द | | हा |
| प | री | वा | र | | वा | न | र | | र | ह | स्य |




प्रकाश में आज प्लॉट फॉर्म




अजय देवगन तिस्का चोप्रा गॅवीन पॅकर्ड
परेश रावल किरणकुमार हुसेन खान



# एस.एस.व्ही.पी.एस. विज्ञान महाविद्यालयात विद्यार्थिनींनीसाठी सायबर क्राईम जनजागृती

**धुळे, दि.३१- श्री. शिवाजी विद्या प्रसारक संस्थेच्याकै.क.डॉ.पां.रा.घोगरे कनिष्ठ विज्ञान महाविद्यालयात विशाखा समितीतर्फे विद्यार्थिनींसाठी सायबर क्राईम जनजागृती या विषयावर मार्गदर्शनपर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. आधुनिक तंत्रज्ञानाचा वाढता वापर लक्षात घेता विद्यार्थिनींनी सायबर विश्वातील संभाव्य धोके ओळखून सतर्क राहावे, या उद्देशाने कार्यक्रम घेण्यात आला.**

यावेळी वरिष्ठ महाविद्यालयातील संगणकशास्त्र विभागाच्या प्राध्यापिका डॉ. स्वाती बोरसे यांनी विद्यार्थिनींना सायबर गुन्ह्यांच्या विविध प्रकारांबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. सोशल मीडिया, ऑनलाइन व्यवहार, बनावट लिंक, फिशिंग, ओटीपीची फसवणूक, पासवर्ड चोरी, वैयक्तिक माहितीचा गैरवापर यासोबतच डीपफेक व्हिडिओ, मॉर्फिंग केलेले फोटो व व्हिडिओ आणि त्यांचा गैरवापर करून होणारे ब्लॅकमेलिंग याबाबत त्यांनी विशेष जनजागृती केली. तंत्रज्ञानाच्या मदतीने एखाद्या व्यक्तीचा चेहरा किंवा आवाज वापरून बनावट व्हिडिओ तयार केले जाऊ शकतात. अशा डीपफेक किंवा मॉर्फिंग व्हिडिओचा वापर करून बदनामी करणे, मानसिक त्रास देणे किंवा ब्लॅकमेलिंग करण्याचे प्रकार घडू शकतात,त्यामुळे विद्यार्थिनींनी सोशल मीडियावर आपली वैयक्तिक छायाचित्रे, व्हिडिओ आणि माहिती शेअर करताना विशेष काळजी घ्यावी, असे डॉ. बोरसे यांनी सांगितले. एखाद्या विद्यार्थिनीचा फोटो किंवा व्हिडिओ मॉर्फ करून त्याचा गैरवापर केला गेल्यास अथवा डीपफेक व्हिडिओ तयार करून धमकी किंवा ब्लॅकमेलिंग केले जात असल्यास घाबरून जाऊ नये, संबंधित व्यक्तीच्या दबावाला बळी पडू नये आणि कोणतीही रक्कम देऊ नये, असे त्यांनी केले. अशा प्रकारच्या घटनांमध्ये पुरावे म्हणून संबंधित संदेश, स्क्रीनशॉट, लिंक, फोन नंबर अथवा सोशल मीडिया खात्याची माहिती जतन करून सायबर क्राईम हेल्पलाईन क्रमांक १९३० वर तातडीने तक्रार नोंदवावी,तसेच आवश्यकतेनुसार अधिकृत सायबर गुन्हे तक्रार प्रणालीवर तक्रार करावी, असे आवाहन त्यांनी केले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एम. व्ही. पाटील होते. प्रमुख पाहुणे म्हणून महाविद्यालयाचे उपप्राचार्य श्री. आर. के. पाटील उपस्थित होते. यावेळी महाविद्यालयातील शिक्षकवर्ग तसेच विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. अध्यक्षीय मनोगतात प्राचार्य डॉ. एम. व्ही. पाटील यांनी आधुनिक तंत्रज्ञानाचा सकारात्मक वापर करण्याबरोबरच त्यातील संभाव्य धोके ओळखून विद्यार्थिनींनी जागरूक व जबाबदार डिजिटल नागरिक बनावे, असे आवाहन केले. कार्यक्रमाचे नियोजन विशाखा समितीतर्फे करण्यात आले. विद्यार्थिनींच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने सायबर गुन्ह्यांसारख्या महत्त्वपूर्ण विषयावर जनजागृतीपर कार्यक्रम आयोजित केल्याबद्दल कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी समितीतील सर्व सदस्यांनी परिश्रम घेतले.

# सि.गो.पाटील महाविद्यालयाचे अर्थशास्त्र विभागात संशोधन क्षेत्रात उल्लेखनीय यश

**साक्री, दि.३१- कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव संलग्न विद्या विकास मंडळाचे सिताराम गोविंद पाटील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, साक्री येथील अर्थशास्त्र विभागाच्या संशोधन केंद्राने संशोधन क्षेत्रात उल्लेखनीय यश संपादन केले आहे.**

महाविद्यालयातील पीएच. डी. संशोधक विद्यार्थी संदीप लक्ष्मण पवार यांनी संशोधक मार्गदर्शक डॉ. पंकज साहेबराव अहिरे यांच्या मार्गदर्शनाखाली विकसित केलेल्या या उपकरणाच्या डिझाइनची भारत सरकारच्या पेटंट कार्यालयाकडून नोंदणी करण्यात आली आहे.

या उपकरणाच्या डिझाइनला डिझाइन नोंदणी क्रमांक ४९८२१४-००१ प्राप्त झाला असून, त्याची नोंदणी ११ एप्रिल २०२६ रोजी करण्यात आली आहे. पेटंट कार्यालयाकडून या डिझाइनचे अधिकृत प्रमाणपत्र २ जुलै २०२६ रोजी जारी करण्यात आले. अर्थशास्त्र विषयातील संशोधनातून नावीन्यपूर्ण आणि तांत्रिक स्वरूपाची संकल्पना विकसित करून तिच्या डिझाइनला पेटंट नोंदणी मिळणे, ही महाविद्यालयाच्या संशोधन कार्यातील महत्त्वपूर्ण कामगिरी मानली जात आहे.

हे उपकरण अकाउंटिंग व्यवहारांमध्ये होणाऱ्या संभाव्य चुका शोधणे, व्यवहारातील अचूकता वाढविणे तसेच लेखा व्यवहार अधिक विश्वासार्ह करण्याच्या उद्देशाने विकसित करण्यात आले आहे. आर्थिक व्यवहारांचे वाढते डिजिटायझेशन आणि लेखा प्रक्रियेत अचूकतेची वाढती गरज लक्षात घेता, व्यवहारांमध्ये होणाऱ्या संभाव्य चुका शोधण्यासाठी विकसित करण्यात आलेल्या या उपकरणाच्या संकल्पनेला विशेष महत्त्व आहे.

या संशोधनात्मक संकल्पनेला भारत सरकारच्या पेटंट कार्यालयाकडून डिझाइन नोंदणी मिळाल्यामुळे सिताराम गोविंद पाटील महाविद्यालयाच्या अर्थशास्त्र विभागाच्या तसेच संशोधन केंद्राच्या संशोधन कार्याची राष्ट्रीय पातळीवर दखल घेण्यात आली आहे. पीएच. डी. संशोधनासोबत नावीन्यपूर्ण संकल्पना विकसित करून तिचे बौद्धिक संपदा अधिकारांच्या माध्यमातून संरक्षण करण्याच्या दिशेने हे यश महत्त्वपूर्ण पाऊल ठरले आहे.

या उल्लेखनीय यशाबद्दल विद्या विकास मंडळाच्या अध्यक्षा मंगला सुरेश पाटील, सचिव सुरेश पाटील, उपाध्यक्ष चंद्रजीत पाटील, प्रशासकीय अधिकारी डॉ.डी.एल. तोरवणे ,माजी प्राचार्य डॉ. राजेंद्र अहिरे, प्राचार्य अनंत पाटील, तसेच महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी आणि विविध क्षेत्रांतील मान्यवरांनी संशोधक विद्यार्थी श्री. संदीप लक्ष्मण पवार, डॉ. आशिष सिताराम निकम आणि संशोधक मार्गदर्शक डॉ. पंकज साहेबराव अहिरे यांचे अभिनंदन केले. त्यांच्या पुढील संशोधन कार्यासाठी मान्यवरांनी शुभेच्छा व्यक्त केल्या.

**रक्तदान हेच सर्वश्रेष्ठ दान**

# बसमधील प्रवासी महिलेचा मृत्यू

धुळे, दि.३१ - शिरपूर आगाराच्या नाशिक- धुळे बसने प्रवास करणाऱ्या महिलेचा मृत्यू झाला. करुणा हेमंत सोनवणे (वय २४ रा.पवन नगर, चाळीसगाव रोड धुळे) असे तिचे नाव आहे. बुधवारी रात्री आठला परिवहन महामंडळाच्या बसने येत असताना येथील डी मार्ट जवळ बस थांबली. तिला घेण्यासाठी पती आलेले होते. बस थांबल्यानंतरही तिची हालचाल होत नसल्याने वाहकाने तिच्या पतीला आवाज दिला. पतीने करुणा सोनवणे हिस सर्वोपचार रुग्णालयात दाखल केले. डॉक्टरांनी तिला मृत घोषित केले. चाळीसगाव रोड पोलीस ठाण्यात आकस्मिक मृत्यूची नोंद झाली.

## धुळे जिल्हयातील ''ब'' वर्गातील सहकारी संस्थांच्या व्यवस्थापक समितीचा पंचवार्षिक निवडणूक कार्यक्रम
## सन २०२६ ते २०३१ करीता मतदार यादीचा कार्यक्रम (फक्त सभासदांकरिता)

महाराष्ट्र सहकारी संस्था (समिती निवडणुक) नियम २०१४ चे नियम ६ व ११ मधील तरतुदीनुसार खाली नमुद संस्थांचा प्रारुप मतदार यादीचा कार्यक्रम खालील प्रमाणे प्रसिध्द करण्यात येत आहे-

साक्री तालुका- १) पानखेडा आदिवासी विविध कार्यकारी सहकारी संस्था मर्या. पानखेडा ता.साक्री, जि.धुळे

| अ. क्र. | तालुका | तपशिल | प्रारुप मतदार यादी प्रसिध्द करणे दिनांक व वेळ | प्रारुप मतदार यादीवर हरकती स्वीकारणे अंतिम दिनांक व वेळ | आलेल्या हरकतीवर निर्णय देणेसाठी सुनावणी दिनांक व वेळ | अंतिम मतदार यादी प्रसिध्द करणे दिनांक व वेळ |
|---|---|---|---|---|---|---|
| | | स्थळ | जिल्हा सहकारी निवडणुक अधिकारी तथा जिल्हा उप निबंधक, सहकारी संस्था, धुळे व संबंधीत तालुका सहकारी निवडणुक अधिकारी तथा सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, साक्री, जि. धुळे यांचे व संस्थेचे कार्यालय | जिल्हा सहकारी निवडणुक अधिकारी तथा जिल्हा उप निबंधक, सहकारी संस्था, धुळे यांचे कार्यालय | जिल्हा सहकारी निवडणुक अधिकारी तथा जिल्हा उप निबंधक, सहकारी संस्था, धुळे यांचे कार्यालय | जिल्हा सहकारी निवडणुक अधिकारी तथा जिल्हा उप निबंधक, सहकारी संस्था, धुळे व संबंधीत तालुका सहकारी निवडणूक अधिकारी तथा सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, साक्री, जि.धुळे यांचे व संस्थेचे कार्यालय |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| १ | साक्री | उक्त नमुद संस्था | ०१/०९/२०२६ कार्यालयीन वेळेत. | ०१/०९/२०२६ ते १०/०९/२०२६ कार्यालयीन वेळेत | १५/०९/२०२६ सकाळी ११.०० वाजता<br>सुनावणीवर निर्णय घेणे अंतिम दिनांक २१/०९/२०२६ पर्यंत | १) हरकती/सुचना प्राप्त झाल्यास दि.२५/०९/२०२६ रोजी कार्यालयीन वेळेत अथवा<br>२) कोणतीही हरकत/सूचना प्राप्त नसल्यास दि.१५/०९/२०२६ रोजी कार्यालयीन वेळेत प्रारुप मतदार यादी हिच अंतिम मतदार यादी म्हणुन प्रसिध्द करण्यात येईल. |

दाखल करावयाची हरकत/सूचना ही लेखी अर्जाद्वारे व पुराव्यानिशी करणे अनिवार्य राहील. संस्थेच्या सभासदास प्रारुप मतदार यादीवर हरकती जिल्हा सहकारी निवडणुक अधिकारी तथा जिल्हा उप निबंधक, सहकारी संस्था, धुळे यांचे कार्यालयात दाखल करता येईल. हरकतदारास सुनावणीची नोटीस स्वतंत्रपणे निर्गमीत करण्यात येणार नसल्यामुळे उपरोक्त नमूद सुनावणीच्या दिनांकास व वेळेत हरकतदाराने समक्ष उपस्थित राहणे अनिवार्य आहे व ती हरकतदाराची वैयक्तीक जबाबदारी राहील. अन्यथा हरकतदाराच्या गैरहजेरीत योग्य तो निकाल केला जाईल.

प्रारुप मतदार यादी व अंतिम मतदार यादी ही मा.सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे कार्यालयाचे संकेतस्थळ **http://sahakaryukta.maharashtra.gov.in** येथे शक्यतोवर प्रसिध्द करण्यात येईल.

स्थळ :- धुळे, दिनांक :- २५ ऑगस्ट, २०२६

(मनोज चौधरी)
जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी तथा,
जिल्हा उप निबंधक, सहकारी संस्था, धुळे

**CHANGE NAME**

MY PREVIOUS NAME WAS **KALEEM AHMAD ABDUL BASIT** AND MY NEW NAME IS **ANSARI MOHAMMAD KALIM ABDUL BAASIT**
ADD- 447/42 NEAR FALAH DAAREN MASJID MILLAT NAGAR, DHULE-424001 (M.S.)

**CHANGE NAME**

MY PREVIOUS NAME WAS **SUMAIYA PARVEEN ABDUL SHAKOOR** AND MY NEW NAME IS **SUMAIYYA BANO AQUEEL AHMAD ANSARI**
ADD- 4380, AGRA ROAD, NEAR NOORANI MASJID, LANE NO.5, ISLAMPURA, DHULE-424002

**CHANGE NAME**

MY PREVIOUS NAME WAS **ANSARI SAMRIN JAVEDHAJI** AND MY NEW NAME IS **ANSARI SAMRIN MOHAMMAD SAAD**
ADD- 2458, LINE NO.14, MADHAVPURA, DHULE-424001 (M.S.)

**CHANGE NAME**

MY PREVIOUS NAME WAS **TANWEER BANO ABDUL MANNAN** AND MY NEW NAME IS **TANVEER BANO MOHAMMAD KALIM ANSARI**
ADD- 447/42 NEAR FALAH DAAREN MASJID MILLAT NAGAR, DHULE-424001 (M.S.)

**NAME CHANGE**

I HAVE CHANGE MY NAME FROM **ASEEM AHMAD DABIR AHMAD SHAIKH** TO **ASEEM AHMED DABIR AHMED SHAIKH**
ADD- PLOT NO.9, GAJANAN COLONY, OPP.SURYA GYM, CHALISGAON ROAD, DHULE-424001.

**NAME CHANGE**

I HAVE CHANGE MY NAME FROM **DABIR AHMAD AJI J AHMED SHAIKH** TO **DABIR AHMED AJIJ AHMED SHAIKH**
ADD- PLOT NO.9, GAJANAN COLONY, OPP.SURYA GYM, CHALISGAON ROAD, DHULE-424001.

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस तसेच सर्व वित्तीय संस्था, बँका, पतसंस्था, व सर्व संबंधीतांना या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

**मिळकतीचे वर्णन-** १) मौजे जुन्हेर ता.जि.धुळे येथील गट क्रं. व उपविभाग २५ चे ला.ला क्षेत्र १ हे ३५ आर, व पो.ख.० हे. ४९ आर असे एकूण क्षेत्र १ हे ८४ आर चा आकार १ रु.८१ पैसे यापैकी ईश्वर शामराव चव्हाण आणि मुकुंदा शामराव चव्हाण यांच्या अविभक्त हिस्साचे ला.ला क्षेत्र ० हे ४५ आर, व पो.ख.० हे. १६ आर असे एकूण क्षेत्र १ हे ६१ आर चा आकार ० रु.६० पैसे आणि मुकुंदा शामराव चव्हाण यांचे अविभक्त हिस्साचे ला.ला. क्षेत्र ० हे ४५ आर, व पो.ख.० हे. १७ आर असे एकूण क्षेत्र १ हे ६२ आर चा आकार ० रु. ६० पैसे अश्या वर्णनांच्या जिरायत शेतजमिनी मिळकती यास जुन्या वहिवाटी प्रमाणे कायमस्वरूपी वापर रस्ता आहे व राहिल.

यासी वरील दोंन्ही मिळकतींची चतु:सिमा गाव नकाशाप्रमाणे

१) मौजे जुन्हेर ता.जि.धुळे येथील गट क्रं. व उपविभाग १९/१/अ/२ चे ला.ला क्षेत्र ० हे ४६ आर, व पो.ख.० हे.०० आर असे एकूण क्षेत्र ० हे ४६ आर चा आकार ० रु.६१ पैसे ही प्रल्हाद शामराव चव्हाण यांच्या मालकीची असून यापैकी ० हे. ०६ आर रस्तासाठी सोडून अशा वर्णनाची जिरायत शेतजमीन मिळकत यास जुन्या वहिवाटी प्रमाणे कायमस्वरुपी वापर व रस्ता राहिल.

**यासी चतु:सिमा गाव नकाशाप्रमाणे**

येणे प्रमाणे वरील वर्णनांच्या आतील मिळकत या वरील नमूद मालकांच्या मालकीच्या मालकीच्या व ताबेउपभोगातील असून यांच्या कडून सदर मिळकतीं या आमचे अशिल यांनी कायमस्वरूपी विकत घेण्याचा सौदा केलेला असून सदर मिळकत सौदापोटी आमचे अशिलांकडून त्यांनी बयाणा रक्कम देखील स्विकारलेली आहे. आमचे अशिल सदरचा व्यवहार लवकरच पूर्ण करणार आहेत. तरी सदर मिळकती संदर्भात कोणाचेही कुठल्याही प्रकारचे संबंध, हक्क, गहाण, तारण टाच, बक्षिस, दावा, अर्जफाटे, हितसंबंध, तक्रार अथवा हरकत असेल तर त्यांनी सदरची नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ७ दिवसांचे आत खाली दिलेल्या पत्त्यावर लेखी व कागदोपत्री पुरावा दाखवून प्रत्यक्ष भेटून शहानिशा करुन खात्री करुन द्यावी. अन्यथा उक्त मुदतीत कोणाचीही हरकत, तक्रार न आल्यास सदरची मिळकज ही निर्बोज, निर्वेध व वरील मालकांच्या मालकीच्या व ताबेउपभोगातील असल्याचे गृहीत धरुन खरेदीचा व्यवहार आमचे अशिल पूर्ण करतील. त्यानंतर आलेल्या हरकतींच अथवा तक्रारींचा विचार केला जाणार नाही. व परस्पर वर्तमानपत्रातून घेतलेल्या हरकती ग्राहय धरल्या जाणार नाहीत. व ते आमच्या अशिलांवर सदर मिळकतीवरही बंधनकारक राहणार नाही, याची नोंद घ्यावी.

सदरची जाहीर नोटीस ही आमच्या अशिलांनी दिलेल्या माहिती अधिकार व सांगण्यावरुन त्यांचेतर्फे आमचेमार्फत प्रसिध्दीस दिली असे. धुळे, दि.३१/०८/२०२६.

**ॲड.ललित पांडुरंग देठे**
चव्हाण कॉम्प्लेक्स, सुरतवाला बिल्डींगजवळ, मिलपरीसर, धुळे
**मो.नं.९४२२७७१२७४**

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस तसेच सर्व वित्तीय संस्था, बँका, पतसंस्था यांना या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

**मिळकतीचे वर्णन-** मौजे अवधान धुळे म.न.पा. हद्दीतील गट नं.१३९/२ चे जिरायत क्षेत्र १ हे. २९ आर पो.ख. ० हे. ५५ आर चे एकूण क्षेत्र १ हे. ८४ आर आकारणी ५ रु. २५ पैसे यापैकी २ एकर शेतजमीन भुधारणा पध्दती १ अशी शेतजमीन ही माझे मालकीची शेतजमीन विक्री करण्याचा सौदा केला ती शेतजमीन यासी चतु:सिमा गांव नकाशा प्रमाणे

वर नमुद वर्णन केलेला शेतीजमीन/मिळकत ही श्री.चंद्रकांत श्रीराम शिंगाडे रा. मोहाडी उपनगर, धुळे यांचे मालकीचे व प्रत्यक्ष कबजे ताबे उपभोगातील आहे. सदरची मिळकत आमचे अशिल यांनी कायम खरेदी करण्याबाबत सौदा केला आहे. व बयाणा अदा केलेला आहे. सबब आमचे अशिल वरील मिळकतीचा खरेदीचा व्यवहार लवकरच पूर्ण करणार आहेत.

वर नमूद शेतजमीन/मिळकतीवर नमुद केलेल्या मालका व्यतिरिक्त इतर कोणाचाही कोणत्याही प्रकारचा गहाण, तारण, टाच, बोजा, खरेदी विक्री, करार, हस्तांरतण हिस्सा, व्यवहार, अधिकार अगर हितसंबध असल्यास ही जाहीर नोटीस प्रसिध्द झालेपासून ७ दिवसांचे आंत आमचे खालील पत्यावर लेखी व मुळ कागदपत्रांसह हरकत नोंदवावी परस्पर वर्तमानपत्रात जाहीर केलेली कोणतीही हरकत आमचे अशिलावर बंधनकारक राहणार नाही.

वरील कालावधीत कुणाचीही कोणतीही हरकत न आल्यांस वरील शेतजमीन/मिळकत ही निर्बोज व निर्वेध आहे असे गृहित धरुन आमचे अशिल वर नमुद शेतजमीन/मिळकतीचा अंतिम व्यवहार पूर्ण करतील. आणि त्यानंतर कोणतीही तक्रार आमचे अशिलावर व सदर मिळकतीवर बंधनकारक असणार नाही यांची नोंद घ्यावी.

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आमचे पक्षकाराने दिलेल्या माहिती व सांगणेवरुन आमचे मार्फत दिली असे. धुळे, दिनांक- ३१/०८/२०२६.

**ॲड.लखमीचंद अ.गुजर,** ॲडव्होकेट व नोटरी
ग.नं.२, घर नं.३३२६, मुल्लावाडा, धुळे.
**मो.नं.९४२३४९३०८९**

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस तसेच सर्व वित्तीय संस्था, बँका, पतसंस्था, शासकीय व निमशासकीय संस्था, सावकार वगैरे या सर्वांना आमचे अशिल १) श्रीमती क्रांती रविंद्र काकडे, २) सौ.तेजस्विनी रुपेश सानप, ३) सिध्देश रविंद्र काकडे यांच्या सांगण्यावरुन जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

**मिळकतींचे वर्णन :-** ता.जि.धुळे, पो.तु.ता.धुळे पैकी पं.स. धुळे पैकी ग्रामपंचायत ढंढाणे हद्दीतील शेतजमीन गट नं.४८/२, त्यांसी क्षेत्र २ हे. ७४ आर पो.ख. ० हे. ४० आर एकूण ३ हे. १४ आर आकार रू.५ पै. ५०

सदर मिळकत ही सुरुवातीस स्व.गुलाब चैत्राम पाटील यांच्या मालकी व ताबे उपभोगातील होती. सदर मिळकत विक्री करण्याचा सौदा करार स्व.गुलाब पाटील यांनी त्यांच्या हयातीत आमचे अशिलांचे वडील स्व.रविंद्र त्रंबक काकडे यांचे लाभात दि.२५/०२/२०१० रोजीच्या नोंदणीकृत सौदा करारनुसार विक्री करण्याचा सौदा करार केलेला आहे. सदर सौदा करारापोटी स्व.रविंद्र त्रंबक काकडे यांनी त्यांच्या हयातीत बयाणा म्हणून मोठया प्रमाणावर रक्कमा संबंधितांना अदा केलेल्या आहेत.

आमचे अशिल हे स्व.रविंद्र त्रंबक काकडे यांचे कायदेशीर वारस आहेत. अशा परिस्थितीत वर नमुद मिळकतीत आमचे अशिलांचे हक्क व अधिकार प्रस्थापित झालेले आहेत. मात्र स्व.गुलाब पाटील यांचे वारस नामे सुभाष गुलाब पाटील हे वर नमुद मिळकतीत त्रयस्थ हक्क व अधिकार निर्माण करण्याच्या प्रयत्नात असल्याबाबत आमचे अशिलांना खात्रीलायकरित्या समजले आहे.

सबब तमाम लोकांना या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, वर नमुद मिळकतीसंदर्भात कोणीही आमचे अशिलांच्या पुर्व लेखी परवानगीशिवाय मिळकत हस्तांतरणाचा कुठलाही व्यवहार करू नये व करून घेवू नये, याही उपर कोणीही वर नमुद मिळकती संदर्भात कोणत्याही प्रकारचा मिळकत हस्तांतरणाचा व्यवहार केल्यास असा व्यवहार आमचे अशिलांवर आणि वर नमुद मिळकतीवर बंधनकारक राहणार नाही. याची नोंद घ्यावी तसेच अशावेळी व्यवहार करणार व करून देणार यांचेविरूध्द आमचे अशिल कडक कायदेशीर कारवाई करतील व त्यावेळी होणाऱ्या खर्च व परिणामास संबंधित जबाबदार राहतील. याची नोंद घ्यावी.

धुळे, दिनांक- ३१/०८/२०२६.

**ॲड.रूपाली लक्ष्मण वर्शीकर**
ऑफिस- साठे चाळ, भिडे बाग, देवपूर, धुळे-४२४००२
**मो.नं.९७६७३३५२४९**

## जाहीर नोटीस

तमाम लोकांना सर्व वित्तीय संस्था, बँका, पतसंस्था यांना जाहिर नोटीसीने कळविण्यात येते की, मौजे आनकवाडी ता.जि.धुळे येथील ग.नं.४२/१/ब चे ला.ला.१ हे ७० आर पो.ख.० हे १० आर एकूण क्षेत्र १ हे ८० आर आकार २ रू ५० पैसे शेतजमीन कच्ची विहीर यासी चतु:सिमा पूर्वेस- शाळा, पश्चीमेस- गायकवाड यांचे शेत, दक्षिण- वसंत उमता यांचे शेत, उत्तरेस- सडगांव रस्ता.

येणेप्रमाणे वर्णनाच्या व चतु:सिमेच्या आतील मिळकत ही श्री सखाराम सिधुजी गवळी रा.नागाई कॉलनी, देवपूर, धुळे यांचे मालकीचे ताबे उपभोगातील आहे. सदर वरीलप्रमाणे मिळकत ही आमचे अशिल यांनी कायम खरेदीने विकत घेण्याचा सौदा केलेला आहे. व त्यापोटी बयाणा रक्कम दिलेली आहे. लवकरच आमचे अशिल खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करणार आहेत.

तरी तमाम लोकांना, सर्व वित्तीय संस्था, बँका, पतसंस्था यांना या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, सदर मिळकतीवर कोणाचीही कोणत्याही प्रकारे हरकत असल्यास तसेच मिळकत हक्क, हिस्सा, टांच, गहाण, बक्षिस, जप्ती, बोजा, पतपेढी, जनरल मुखत्यार हक्क, मृत्युपत्र, सौदापावती, बोजा, खावटी हक्क, कोर्ट कचेरी, असे कोणत्याही प्रकारचे हक्क किंवा हितसंबंध असल्यास लेखी हरकत किंवा तक्रार ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १० दिवसाच्या आत वैयक्तिकपणे कागदपत्रासह खालील पत्त्यावर कळवावी. मुदतीत हरकती अगर तक्रारी न आल्यास आमचे अशील सदरहू मिळकतीचा खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील व त्यानंतर येणाऱ्या हरकती अगर तक्रारी आमच्या अशिलांवर बंधनकारक राहणार नाही.

सदरची नोटीस आमच्या अशिलांच्या सूचनेवरून आमचे मार्फत प्रसिध्दीस दिली आहे. दिनांक- ३१/०८/२०२६, ठिकाण- धुळे.

**ॲड.प्रमोद एम.चौधरी**
११४, गोविंदा अपार्टमेंट, देवपूर, धुळे
**मो.नं.९८६०७०६१७१**

## जाहीर नोटीस

तमाम जनता, सर्व वित्तीय कंपन्या, बँका, पतसंस्था विषेश करुन मे.वेस्टास आर.आर.बी. इंडिया लि. दिल्ली तर्फे देवेंद्रकुमार जनकराज चोपडा, भिमाबाई धुडकु, शानाबाई दगा, खुमाबाई राजाराम यांचे वारस, वंजी दगा महाले, धुडकाबाई दगा महाले, शिवाजी दगा पाटील, आशाबाई कृष्णा शेलार, सुशिलाबाई काशिनाथ पाटील इत्यादी यांना सदर जाहीर नोटीसीने सूचित करण्यात येते की,

खालील वर्णनाची शेतजमीन मिळकतीचे मुळ मालक कै.सदु भगवान पाटील हे होते त्यांचे निधनानंतर सदर मिळकतीस त्यांची मुले कै.शंकर सदु व भगवान सदु यांची नावे वारसा हक्काने सदर मिळकतीस लागले. सदर मिळकतीस वर नमुद लोकांच्या पूर्वज कै.दशरथ सदु यांनी खालील नमूद मिळकतीस कै.शंकर सदु यांचे वडिलांचे सदु असल्याचे गैरफायदा घेवून दशरथ यांनी नाव लावून घेतले वास्तविक दशरथ हे कै.शंकर यांचे नात्याने व्याही होते. कारण त्यांच्या मुलास शंकर यांची मुलगी दिलेली होती. अशा नातेसंबंधाचा गैरवापर करुन दशरथ यांनी सदर मिळकतीस स्वत:चे नाव बेकायदेशीररीत्या लावून घेतले त्यांच्या पश्चात वर नमूद व्यक्तींनी वेळोवेळी लावून घेतली. वास्तविक सदरची मिळकत ही नोटीस देणार यांचे वडिलोपार्जित मालकी हक्क व सामाईक कब्जे उपोभोगातील अविभक्त हिश्याची आहे.

नोटीसीतील वर नमूद व्यक्ती खालील नमूद मिळकतीच्या उताऱ्यावर त्यांचे नावे असल्याने त्याचा गैरफायदा घेवून सदर मिळकत त्रयस्त व्यक्ती यांना खरेदी-विक्री करण्याच्या तयारीत आहेत असे आमचे अशिल यांना खात्रीलायकरित्या माहिती झालेली आहे. आमचे अशिल यांची सदर व्यवहारास सक्त हरकत आहे कारण आमचे अशिलांचा सदर मिळकतीवर वडिलोपार्जित सामाईक मालकी हक्क व अविभक्त हिस्सा आहे. आमचे अशिल यांचा अविभक्त सामाईक हिस्सा पृथक झालेला नाही.

अशा परिस्थितीत तमाम जनता यांना सदर नोटीसीने कळविण्यात येते की, सदर मिळकतीचे कोणतेही स्वरुपाचे तबदीलीचे अथवा हस्तांतराचे व्यवहार करु नये केल्यास ते आमचे अशिलांवर व सदर मिळकतीवर बंधनकारक राहणार नाही. या उपरही सदर मिळकतीबाबत तबदिलीचे व्यवहार झाल्यास त्यास सर्वस्वी तिच व्यक्ती जबाबदार राहिल. आमचे अशिल लवकरच त्यांचा वडिलोपार्जित मिळकतीतील सामाईक हिस्सा पृथक करण्यासाठी योग्य ती कायदेशीर कारवाई करणार आहे. आमचे अशिल सदर मिळकतीबाबत कुणाचीही फसवणुक होवू नये म्हणून सदरची जाहीर नोटीस प्रसिध्दीस देत आहेत याची नोंद घ्यावी.

**मिळकतींचे वर्णन :-** मौजे- आयने ता.साक्री जि.धुळे येथील गट क्र.४४ चे क्षेत्र लाला हे. ४.९८ आर+पो.ख. हे. २.९८ आर एकूण क्षेत्र हे. ७.९६ आर आकार रु. २.३५ पैसे त्यासी चतु:सिमा गाव नकाशाप्रमाणे.

सदरची जाहिर नोटीस आमचे अशिलाने दिलेल्या माहितीच्या आधारे त्याचे तर्फे आमचे मार्फत प्रसिध्दीस दिली असे. येणेप्रमाणे जाहिर नोटीस असे. धुळे, दि.३१/०८/२०२६.

**ॲड.कमलेश झेड.मुथा**
२०, यमुनाई, संत निरंकारी भवनाच्या मागे, साक्री रोड, धुळे
**मो.नं.७५८८५१७६९८**

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, मौजे वलवाडी येथील स.नं.१७/१/ब प्लॉट नं.६८ चे एकूण क्षेत्र १८३.२५ चौ.मी. बखळ प्लॉट यासी चतु:सिमा

| दिशा | मापे | चतु:सिमा |
|---|---|---|
| पुर्वेस- | १५.०० मीटर, | प्लॉट नं.६७, |
| पश्चिमेस- | १५.०० मीटर, | ६ मीटर रुंदीचा रस्ता |
| दक्षिणेस- | ११.५० मीटर, | ६ मीटर रुंदीचा रस्ता |
| उत्तरेस- | १०.०० मीटर, | प्लॉट नं.५९ |

येणे प्रमाणे वर्णनाची आतील प्रकाश बाबुलाल बाविस्कर रा.४, सप्तश्रृंगी कॉलनी, वलवाडी शिवार, धुळे व वकील चुडामण पगारे रा. नवापूर, जि.नंदुरबार यांचे मालकीची व ताबे उपभोगातील असून त्यानी सदरहु मिळकत कायमस्वरुपी विकणेचा सौदा आमचे अशिल यांच्याशी केला आहे.

आमचे अशिल यांना सदर मिळकतीचा खरेदीचा व्यवहार लवकरच पूर्ण करावयाचा आहे. तरी सदर मिळकतीच्या बाबतीत सरकारी, निमसरकारी, संस्था, वित्तीय संस्था, बँका व इतर कोणाचाही खाजगी हक्क अधिकार, गहाण, टांच, बक्षिस, बोजा, लीज, सौदा, करार, मुखत्यार, मृत्युपत्र वगैरे कोणत्याही प्रकारचा तबदिलीचा व्यवहार असल्यास सदर मिळकती वर कोणत्याही प्रकारे हिस्सा, अधिकार असल्यास त्यांनी सदरची नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ०७ सात दिवसांच्या आत खालील पत्यावर सदर मिळकती संबधीत मुळ कागदोपत्री पुराव्यानिशी व त्याचे झेरॉक्स प्रती जोडून लेखी स्वरुपात हरकतीसह प्रत्यक्ष भेटून आपली हरकत नोंदवावी. तोंडी हरकत अथवा परस्पर वर्तमान पत्रात जाहीर हरकत नोटीस दिल्यास सदरचे हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही. वरील मुदतीत कोणाची काहीही एक हरकत न असल्यास सदरची मिळकती निर्बोज व निर्वेध समजण्यात येईल व आमचे अशिल त्यांचा खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील, त्यानंतर मात्र कोणची हरकत आल्यास ती आमचे अशिलावर बंधनकारक राहणार नाही.

सदरची नोटीस पक्षकाराने दिलेल्या कागदपत्राच्या व माहितीवरुन व सांगणेवरुन आमचे मार्फत प्रसिध्दीस दिली असे.

ठिकाण- धुळे, दिनांक:- ३१/०८/२०२६.

**ॲड.चेतन महादु यादव**
पत्ता- सि.स.नं.२५९७/अ, श्रीसदगुरू सदन, गल्ली नं.५, मिरच्या मारुती चौक, धुळे-४२४००१
**मो.नं.९६८९१२४६९२**

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस तसेच सर्व वित्तीय संस्था, बँका, पतसंस्था, व सर्व संबंधीतांना या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

**मिळकतीचे वर्णन-** मौजे महिंदळे ता.जि. धुळे येथील भुमापन क्रं. व उपविभाग ८६/१/अ/१व३ पैकी प्लॉट नं.२४ चे एकूण क्षेत्र १५५ चौ.मी. चा आकार ११ रू. ४७ पैसे बखळ प्लॉट यासी सि.स.नं.४५४८ चे एकूण क्षेत्र १४८.५० चौ.मी. धारणाधिकार क अशी मिळकत

| यासी | मापे | चतु:सिमा |
|---|---|---|
| पूर्वेस- | १० मी., | सर्व्हे नं.८६/८, |
| पश्चिमेस- | १० मी., | २० फुटी रस्ता, |
| दक्षिणेस- | १५.५ मी., | प्लॉट नं.२३, |
| उत्तरेस- | १५.५ मी., | प्लॉट नं.२५ |

येणे प्रमाणे वरील वर्णनाची आतील मिळकत ही प्रमिला बन्सीलाल पाटील. रा.धुळे ता.जि. धुळे यांच्या मालकीची व ताबेउपभोगातील असून त्यांचा कडून सदर मिळकत ही आमचे अशिल यांनी कायमस्वरुपी विकत घेण्याचा सौदा केलेला असून सदर मिळकत सौदापोटी आमचे अशिलांकडून त्यांनी बयाणा रक्कम देखील स्विकारलेली आहे. आमचे अशिल सदरचा व्यवहार लवकरच पूर्ण करणार आहेत. तरी सदर मिळकती संदर्भात कोणचेही कुठल्याही प्रकारचे संबंध, हक्क, गहाण, तारण टाच, बक्षिस, दावा, अर्जफाटे, हितसंबंध, तक्रार अथवा हरकत असेल तर त्यांनी सदरची नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ७ दिवसांचे आत खाली दिलेल्या पत्त्यावर लेखी व कागदोपत्री पुरावा दाखवून प्रत्यक्ष भेटून शहानिशा करुन खात्री करुन द्यावी. अन्यथा उक्त मुदतीत कोणाचीही हरकत, तक्रार न आल्यास सदर मिळकत निर्बोज, निर्वेध व प्रमिला बन्सीलाल पाटील. रा.धुळे यांच्या मालकीची असल्याचे गृहीत धरुन खरेदीचा व्यवहार आमचे अशिल पूर्ण करतील. त्यानंतर आलेल्या हरकतींच अथवा तक्रारींचा विचार केला जाणार नाही. व परस्पर वर्तमानापत्रातून घेतलेल्या हरकती ग्राहय धरल्या जाणार नाहीत. व ते आमच्या अशिलांवर सदर मिळकतीवरही बंधनकारक राहणार नाही. याची नोंद घ्यावी.

सदरची जाहीर नोटीस ही आमच्या अशिलांनी दिलेल्या माहिती अधिकार व सांगण्यावरुन त्यांचेतर्फे आमचेमार्फत प्रसिध्दीस दिली असे.

धुळे, दिनांक:- ३१/०८/२०२६.
नोटीस देणार तर्फे ॲडव्होकेट

**ॲड.ललित पांडुरग देठे**
चव्हाण कॉम्प्लेक्स, सुरतवाला बिल्डींगजवळ, मिलपरीसर, धुळे
**मो.नं.९४२२७७१२७४**

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, मौजे वलवाडी, ता.जि. धुळे येथील सर्व्हे नं.३२/९/३२/२/३२/३ पैकी प्लॉट नं.४८ चे क्षेत्र २७९ चौ.मी. यापैकी पुर्वेकडील भागाचे क्षेत्र १११.५२ चौ.मी. यांसी चर्तु:सिमा- पुर्वेस : प्लॉट नं.४९, पश्चिमेस : याच प्लॉट नं.४८ पैकी भाग, उत्तरेस : रस्ता, दक्षिणेस : मोकळी जागा. येणे प्रमाणे वर्णनाची बांधीव घर व उर्वरित बळख जागेसह मिळकत १) श्री.शामकांत पंढरीनाथ नेरकर २) सौ. सोनाली शामकांत नेरकर, दोघे रा.शिरपूर, जि.धुळे यांचे मालकीची असून त्यांनी नमूद मिळकत कायमस्वरुपी विकण्याचा सौदा आमचे अशिल श्री.मनोहर आत्माराम येवले, रा. लामकानी, ता.जि.धुळे याच्यांशी केला आहे.

आमचे अशिलांना सदर मिळकतीचा खरेदीचा व्यवहार लवकरच पूर्ण करावयाचा आहे. तरी सदर मिळकतीबाबत कोणाचेही कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध, गहाण, तारण, करार, सौदा, कब्जा, विसार पावती, अन्नवस्त्र, मृत्यूपत्र, बक्षिसपत्र, मुखत्यारपत्र, सॉलवन्सी, कब्जापावती, आरक्षण, रक्कम देणे/घेणे इ. असल्यास अथवा सदर मिळकतीचे कोणतेही मूळ दस्त जमा/तारण असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ७ दिवसांचे आत योग्य त्या कागदपत्रांच्या साक्षांकीत प्रतीसह आमच्या कार्यालयात लेखी हरकत नोंदवावी. परस्पर वर्तमान पत्रात प्रसिध्द केलेल्या व मुदतीनंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही. मुदतीत व योग्य त्या पुराव्यानिशी प्रत्यक्ष आमच्या कार्यालयात हरकत न आल्यास सदरची मिळकत निर्वेध व बिनबोजाची आहे असे समजून संबंधितास तसा दाखला देण्यात येईल व आमचे अशिल त्यांचा खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील, त्यानंतर कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत आमचेवर बंधनकारक असणार नाही.

सदरची नोटीस पक्षकाराने दिलेल्या माहितीवरुन व सांगणेवरून आमचेमार्फत प्रसिध्दीस दिली असे.

धुळे, दिनांक:- ३१/०८/२०२६.

**ॲड.विजय म.मोरे**
नोटरी- भारत सरकार
रा.बी/१२, भन्साली प्लाझा, नगरपट्टी, धुळे
**मो.नं.९८२२८५२६५०**

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, मौजे नगांव बु., ता.जि.धुळे येथील गट नं.३०३/२/अ/३०३/२/ब यापैकी प्लॉट नं.१०५ चे क्षेत्र १०५ चौ.मी. यांसी चर्तु:सिमा पुर्वेस : प्लॉट नं.१२५ व १२६, पश्चिमेस : रस्ता, दक्षिणेस : प्लॉट नं.१०६, उत्तरेस : प्लॉट नं.१०४. येणे प्रमाणे वर्णनाची बखळ प्लॉट मिळकत श्री.रविंद्र हिरालाल बडगुजर, रा.शिंदखेडा, ता.शिंदखेडा, जि.धुळे यांचे मालकीची असून त्यांनी सदरहू मिळकत कायमस्वरुपी विकण्याचा सौदा आमचे अशिल श्री.हेमकांत रामचंद्र लोहार, रा.मुडी प्र.डांगरी, ता.अमळनेर, जि.जळगांव याच्यांशी केला आहे.

आमचे अशिलांना सदर मिळकतीचा खरेदीचा व्यवहार लवकरच पूर्ण करावयाचा आहे. तरी सदर मिळकतीबाबत कोणाचेही कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध, गहाण, तारण, करार, सौदा, कब्जा, विसार पावती, अन्नवस्त्र, मृत्यूपत्र, बक्षिसपत्र, मुखत्यारपत्र, कब्जापावती, सॉल्वन्सी, आरक्षण, रक्कम देणे/घेणे इ. असल्यास अथवा सदर मिळकतीचे कोणतेही मूळ दस्त जमा/तारण असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ७ दिवसांचे आत योग्य त्या कागदपत्रांच्या साक्षांकीत प्रतीसह आमच्या कार्यालयात लेखी हरकत नोंदवावी. परस्पर वर्तमान पत्रात प्रसिध्द केलेल्या व मुदतीनंतर आलेल्या हरकतीचा विचार केला जाणार नाही. मुदतीत व योग्य त्या पुराव्यानिशी प्रत्यक्ष आमच्या कार्यालयात हरकत न आल्यास सदरची मिळकत निर्वेध व बिनबोजाची आहे असे समजून संबंधितास तसा दाखला देण्यात येईल व आमचे अशिल त्यांचा खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील, त्यानंतर कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत आमचेवर बंधनकारक असणार नाही.

सदरची नोटीस पक्षकाराने दिलेल्या माहितीवरुन व सांगणेवरून आमचेमार्फत प्रसिध्दीस दिली असे.

धुळे, दिनांक:- ३१/०८/२०२६.

**ॲड.विजय म.मोरे**
नोटरी- भारत सरकार
रा.बी/१२, भन्साली प्लाझा, नगरपट्टी, धुळे
**मो.नं.९८२२८५२६५०**

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, मौजे मोहाडी प्र.ल., ता.जि.धुळे येथील गट नं.१४०/२अ+१४०/२ब+/१४०/२क पैकी प्लॉट नं.३८ अ चे क्षेत्र १२७.५० चौ.मी. यांसी चर्तु:सिमा- पुर्वेस : प्लॉट नं.५०अ, पश्चिमेस : रस्ता, दक्षिणेस : प्लॉट नं.३८ब, उत्तरेस : प्लॉट नं.३७. येणे प्रमाणे वर्णनाची बखळ प्लॉट मिळकत श्री.रमेश बाबुराव वाघ, रा.मोगलाई, साक्री रोड, धुळे यांचे मालकीची असून त्यांनी नमूद मिळकत कायमस्वरुपी विकण्याचा सौदा आमचे अशिलांशी केला आहे.

आमचे अशिलांना सदर मिळकतीचा खरेदीचा व्यवहार लवकरच पूर्ण करावयाचा आहे. तरी सदर मिळकतीबाबत कोणाचेही कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध, गहाण, तारण, करार, सौदा, कब्जा, विसार पावती, अन्नवस्त्र, मृत्यूपत्र, बक्षिसपत्र, मुखत्यारपत्र, कब्जापावती, सॉल्वन्सी, आरक्षण, रक्कम देणे/घेणे इ. असल्यास अथवा सदर मिळकतीचे कोणतेही मूळ दस्त जमा/तारण असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ७ दिवसांचे आत योग्य त्या कागदपत्रांच्या साक्षांकीत प्रतीसह आमच्या कार्यालयात लेखी हरकत नोंदवावी. परस्पर वर्तमान पत्रात प्रसिध्द केलेल्या व मुदतीनंतर आलेल्या हरकतीचा विचार केला जाणार नाही. मुदतीत व योग्य त्या पुराव्यानिशी प्रत्यक्ष आमच्या कार्यालयात हरकत न आल्यास सदरची मिळकत निर्वेध व बिनबोजाची आहे असे समजून संबंधितास तसा दाखला देण्यात येईल व आमचे अशिल त्यांचा खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील, त्यानंतर कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत आमचेवर बंधनकारक असणार नाही.

सदरची नोटीस पक्षकाराने दिलेल्या माहितीवरुन व सांगणेवरून आमचेमार्फत प्रसिध्दीस दिली असे.

धुळे, दिनांक:- ३१/०८/२०२६.

**ॲड.विजय म.मोरे**
नोटरी- भारत सरकार
रा.बी/१२, भन्साली प्लाझा, नगरपट्टी, धुळे
**मो.नं.९८२२८५२६५०**

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, मौजे मोहाडी प्र.ल., ता.जि.धुळे येथील गट नं.१४०/२अ+१४०/२ब+/१४०/२क पैकी प्लॉट नं.३८ ब चे क्षेत्र १२७.५० चौ.मी. यांसी चर्तु:सिमा- पुर्वेस : प्लॉट नं.४९ब, पश्चिमेस : रस्ता, दक्षिणेस : प्लॉट नं.३९अ, उत्तरेस : प्लॉट नं.३८अ. येणे प्रमाणे वर्णनाची बखळ प्लॉट मिळकत श्री.नथ्थु राघो वाल्हे, रा. मोगलाई, साक्री रोड, धुळे यांचे मालकीची असून त्यांनी नमूद मिळकत कायमस्वरुपी विकण्याचा सौदा आमचे अशिलांशी केला आहे.

आमचे अशिलांना सदर मिळकतीचा खरेदीचा व्यवहार लवकरच पूर्ण करावयाचा आहे. तरी सदर मिळकतीबाबत कोणाचेही कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध, गहाण, तारण, करार, सौदा, कब्जा, विसार पावती, अन्नवस्त्र, मृत्यूपत्र, बक्षिसपत्र, मुखत्यारपत्र, कब्जापावती, सॉल्वन्सी, आरक्षण, रक्कम देणे/घेणे इ. असल्यास अथवा सदर मिळकतीचे कोणतेही मूळ दस्त जमा/तारण असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ७ दिवसांचे आत योग्य त्या कागदपत्रांच्या साक्षांकीत प्रतीसह आमच्या कार्यालयात लेखी हरकत नोंदवावी. परस्पर वर्तमान पत्रात प्रसिध्द केलेल्या व मुदतीनंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही. मुदतीत व योग्य त्या पुराव्यानिशी प्रत्यक्ष आमच्या कार्यालयात हरकत न आल्यास सदरची मिळकत निर्वेध व बिनबोजाची आहे असे समजून संबंधितास तसा दाखला देण्यात येईल व आमचे अशिल त्यांचा खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील, त्यानंतर कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत आमचेवर बंधनकारक असणार नाही.

सदरची नोटीस पक्षकाराने दिलेल्या माहितीवरुन व सांगणेवरून आमचेमार्फत प्रसिध्दीस दिली असे.

धुळे, दिनांक:- ३१/०८/२०२६.

**ॲड.विजय म.मोरे**
नोटरी- भारत सरकार
रा.बी/१२, भन्साली प्लाझा, नगरपट्टी, धुळे
**मो.नं.९८२२८५२६५०**

पान १ वरुन

## देशातील सहा रेल्वेमार्ग खासगी कंपन्यांकडे

प्रयोग ठरणार आहे.

**कंपन्यांशी रेल्वेची चर्चा**

प्रकल्पाची अंमलबजावणी करण्यासाठी रेल्वे प्रशासनाकडून संभाव्य गुंतवणूकदार कंपन्यांशी चर्चा सुरू करण्यात आली आहे. प्रवासी किंवा मालवाहतूक सेवांचे स्वरूप, भाडेकरार, प्रवाशांना उपलब्ध करून देण्यात येणाऱ्या सुविधा आणि प्रस्तावित प्रकल्पांचे संभाव्य फायदे याबाबत कंपन्यांसोबत बैठका घेण्यात आल्या आहेत. पुढील महिन्यात संबंधित कंपन्यांसोबत आणखी एक बैठक होणार असून त्यानंतर प्रकल्पाच्या अंमलबजावणीचे स्वरूप अधिक स्पष्ट होण्याची शक्यता आहे.

**तीन वर्षांपासून खासगी ट्रेनची चर्चा**

देशात खासगी ट्रेन सुरू करण्याची चर्चा यापूर्वीपासूनच सुरू आहे. विशिष्ट थीमवर आधारित ट्रेनप्रमाणे प्रवाशांसाठी खासगी ट्रेन सेवा सुरू करण्याचा प्रस्ताव मांडण्यात आला होता. यासाठी विविध कंपन्यांकडून निविदाही मागविण्यात आल्या होत्या. सुरुवातीला मुंबई-दिल्ली मार्गावर खासगी ट्रेन सुरू करण्याची चर्चा होती. मात्र, या योजनेला अपेक्षित गती मिळाली नाही.

**कंपन्यांकडून शंभर टक्के गुंतवणुक नाही**

सुरुवातीला हे सहा रेल्वे मार्ग डिझाइन, बिल्ड, फायनान्स, ऑपरेट अँड ट्रान्सफर (डीबीएफओटी) पद्धतीने विकसित करण्याचे नियोजन होते. मात्र, रेल्वे मार्गांच्या उभारणीसाठी खासगी कंपन्या शंभर टक्के गुंतवणूक करण्यास इच्छुक नसल्याचे रेल्वे मंत्रालयाच्या निदर्शनास आले. त्यामुळे आता हायब्रीड अॅन्युइटी मॉडेलचा पर्याय स्वीकारण्यात आला आहे. या मॉडेलनुसार खासगी क्षेत्राचा सहभाग कायम ठेवत रेल्वेकडूनही प्रकल्पासाठी मोठ्या प्रमाणात आर्थिक योगदान दिले जाणार आहे. त्यामुळे रेल्वे पायाभूत सुविधांच्या विस्ताराला गती मिळण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

## सीजेपीच्या मोर्चावर बंदीस सर्वोच्च न्यायालयाचा नकार

बीआरआरसीएस परिषदेच्या पार्श्वभूमीवर मोठ्या मिरवणुका आणि निदर्शनांना परवानगी देऊ नये, अशी मागणी त्यांनी याचिकेत केली होती. मात्र, सर्वोच्च न्यायालयाने मोर्चावर सरसकट बंदी घालण्यास नकार दिला. सीजेपीने सरकारसमोर चार प्रमुख मागण्या ठेवल्या असून, त्यापैकी ३ मागण्या अद्याप पूर्ण झाल्या नसल्याचा आरोप पक्षाने केला आहे. विद्यार्थ्यांच्या कुटुंबीयांना नुकसानभरपाई देणे, विद्यार्थ्यांविरोधात दाखल करण्यात आलेले एफआयआर मागे घेणे आणि त्यांच्यावर कोणतीही कारवाई न करणे, तसेच आणि दिल्ली पोलिसांनी माफी मागणे, या मागण्यांचा त्यात समावेश आहे. इंडिया गेट ते पोलीस मुख्यालय मोर्चा पाच सप्टेंबर रोजी सीजेपीचा मोर्चा इंडिया गेटपासून सुरू होऊन नवी दिल्ली पोलीस मुख्यालयापर्यंत जाणार आहे. या मोर्चात नीट पेपरफुटीनंतर आत्महत्या केलेल्या विद्यार्थ्यांचे कुटुंबीयही सहभागी होणार असल्याचे पक्षाकडून सांगण्यात आले आहे. चोवीस ऑगस्ट रोजी पक्षाच्या कार्यकारी समितीच्या व्हर्च्युअल बैठकीनंतर मोर्चाचा निर्णय घेण्यात आला होता. विद्यार्थ्यांविरोधात दाखल करण्यात आलेले खटले रद्द केले जातील, असे सरकारकडून सांगण्यात आले होते; मात्र, अद्याप त्याची अंमलबजावणी झालेली नसल्याचा आरोप सीजेपीने केला आहे. आमच्या संयमाला कमजोरी समजू नये, असा इशाराही पक्षाने दिला असून, पाच सप्टेंबरच्या मोर्चात मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

## व्यापारी संकुलांचा भाडे आकारणी प्रश्न गाजला

त्यांना तात्काळ मंजूरी देण्यात आली. यावेळी नगरसेवक सुनिल बैसाणे यांनी महापालिकेच्या व्यापारी संकुलातील काही लोकांनी परस्पर गाळे विकून कोट्यवधींचा भ्रष्टाचार झाला असल्याचा आरोप केला. या प्रकरणांची चौकशी करून संबंधितांवर गुन्हे दाखल का करू नये ? असा सवाल उपस्थित केला. आयुक्त कापडणीसांनी याची दखल घेवून या प्रकरणाची चौकशी करून गुन्हा दाखल करण्याचे निर्देश दिले. महापालिकेच्या मालकीचे बस स्थानकासमोरील गाळे, प्रबोधनकार ठाकरे संकुलातील दोन गाळे, सुभाष पुतळा समोरील गाळे, शाळा क्र.२ मधील गाळे या ठिकाणच्या अनेक गाळेधारकांनी गाळ्यांची परस्पर विक्री केल्याचा घणाघाती आरोप नगरसेवक बैसाणे यांनी केला. तसेच यामुळे मनपाचे पाच ते दहा कोटींचे उत्पन्न बुडविण्यात आल्याने या प्रकरणाची चौकशी करण्याची मागणीही यावेळी करण्यात आली.

महासभेत नगरसेवक निलेश नेमाने यांनी मनपा मालकीच्या गट क्र.६२/१ या जागेवर प्रस्तावित असलेल्या आरक्षणाचे फेरबदल करून औद्योगिक वसाहत याप्रमाणे आरक्षण प्रस्तावित करण्याच्या विषयावर विचारणा केली की, ही जागा महापालिकेच्या मालकीची कशी ? जागा वर्ग १ आहे की वर्ग २ ची ? त्यावर अधिकाऱ्यांनी वर्ग १ची असल्याचे उत्तर देताच नगरसेवक नेमाने आणखी भडकले. औद्योगिक विकासासाठी जागा वापरली जात असेल तर पंच्याहत्तर टक्के नजराणा भरवा लागेल, ती रक्कम कशी भरणार ? यावर अधिकारी समाधानकारक उत्तर देण्यात असमर्थ ठरले. अभ्यास करून महासभेसमोर विषय ठेवण्यसात यावे अशी कानटोणचीही नेमानेंनी केली. यावर आयुक्त कापडणीसांनी अधिकाऱ्याची चांगलीच खरडपट्टी काढली.

केवळ उत्पन्नवाढीवर चर्चा केली जाते. शहरातील सुरळीत पाणीपुरवठा व स्वच्छतेचा प्रश्न कायमस्वरूपी कधी मार्गी लागणार ? असा परखड प्रश्न नगरसेवक जावेद बिल्डर यांनी उपस्थित केला.

शहरातील ओला व सुका कचरा संकलनाचा ठेका स्वयंभू कंपनीला देण्यात आला होता. महापालिकेने एकुण ८९ घंटागाड्या ठेकेदाराला उपलब्ध करून दिल्या. ठेकेदाराने घंटागाड्या सुस्थितीत देणे बंधनकारक असतांना तब्बल चोवीस गाड्यांची दुरवस्था झालेली आहे. त्याचा आर्थिक भुर्दंड मनपाने का भरवा ? गाड्यांच्या दुरूस्तीची रक्कम ठेकेदाराच्या डिपॉझिटमधून वसुल करण्याची मागणी नगरसेविका चित्रलेखा परदेशी यांनी यावेळी केली.

## गुटखा, अमली पदार्थांचे रॅकेट कधी उध्वस्त करणार?

पुरवठ्याची साखळी, मोठे साठे, वाहतूकदार, वितरक आणि प्रमुख पुरवठादार यांच्यावर पुरेशी कठोर व सातत्यपूर्ण कारवाई होत नसल्याची भावना नागरिकांमध्ये निर्माण झाली आहे. जिल्ह्यातील गुटखा व प्रतिबंधित व्यसनजन्य पदार्थांची अवैध साखळी मुळापासून उद्ध्वस्त करा.

या मागणीचे निवेदन देतांना जिल्हाप्रमुख अतुल सोनवणे,नरेंद्र परदेशी, धीरज पाटील, निंबा मराठे,,भरत मोरे, आण्णा फुलपगारे, दिलिप चित्ते,राजु ढवळे शेखर वाघ,शिवाजी शिरसाळे युवा सेनेचे कुणाल कानकाटे, मनोज जाधव, महिला आघाडीच्या अरुणा मोरे, संगिता जोशी, जयश्री वानखेडे, सुनीता वाघ ,प्रभादेवी परदेशी, ज्योती वानखेडे, कपिल लिंगायत,महादु गवळी, दिनेश पाटील, मुन्ना पठाण, निलेश कांजरेकर, गोकुळ बडगुजर, जयेश फुलपगारे, इशतियाक अंसारी, तरबेज शेख, वैभव पाटील, अविनाश जोंधळे, राजु पाटील, नितीन पाटील, तालुका प्रमुख भैय्या पाटील, मोहनसिंग परदेशी आदी उपस्थित होते.

## अतिदुर्गम भागात गांजाची शेती उध्वस्त

पंचनामा करून गांजाच्या वनस्पती व मुद्देमाल ताब्यात घेण्यात आला. घटनास्थळावरून आरोपी दीपक अभिमान पावरा याला ताब्यात घेण्यात आले असून, दुसरा आरोपी शिलदार कालुसिंग पावरा हा पोलिसांची चाहूल लागताच शेतातून पसार झाल्याचे पोलिसांनी सांगितले. या प्रकरणी शिरपूर तालुका पोलीस ठाण्यात गु.र.नं. २४२/२०२६ अन्वये गुंगीकारक औषधी द्रव्ये व मनोव्यापारावर परिणाम करणारे पदार्थ अधिनियमांतर्गत कलम ८(क), २०(अ)(ळ) व २८ नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.ही कारवाई पोलीस अधीक्षक विशाल आनंद, अपर पोलीस अधीक्षक अजय देवरे यांच्या मार्गदर्शनाखाली उपविभागीय पोलीस अधिकारी सुधीर पाटील यांच्या उपस्थितीत पोलीस निरीक्षक जयपाल हिरे, पोलीस कर्मचारी तसेच अंमलदारांच्या पथकाने केली.

## हमाल कामगार सह. पतपेढीची सभा संपन्न

चितळकर, डॉ. कृष्णा सिंहल, संचालक सदाशिव ठाकरे, रत्नाबाई परदेशी, श्रीमती सिंधूबाई खोडकर, आनंदा महाजन, भिकन चौधरी व मॅनेजर शाम नेवाडकर, सह मॅनेजर भानुदास शेळके व पतसंस्थेचे सर्व सभासद उपस्थित होते, अशी माहिती पतसंस्थेचे चेअरमन गंगाधर कोळेकर यांनी दिली आहे.

पान १ वरुन

## शिरपूर विधानसभा प्रारूप मतदार यादी प्रसिद्ध

यादीत एकूण ३ लाख ५१ हजार १८६ मतदार होते. त्यामध्ये १ लाख ७६ हजार २७२ पुरुष, १ लाख ७४ हजार ९०८ महिला आणि ६ तृतीयपंथी मतदारांचा समावेश होता. प्रारूप मतदार यादीत एकूण ३ लाख ७ हजार २३६ मतदार असून त्यात १ लाख ५६ हजार ३८८ पुरुष, १ लाख ५० हजार ८४२ महिला आणि ६ तृतीयपंथी मतदार आहेत.

पुनरीक्षण प्रक्रियेत १८,४६४ मतदारांच्या नोंदींमध्ये विसंगती आढळल्या असून १४,१३८ मतदारांची नो मॅपिंग नोंद झाली आहे. एकूण ३२,६०२ मतदारांच्या नोंदींवर सुनावणी आवश्यक असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे. या प्रक्रियेत चार नवीन मतदान केंद्रांची निर्मिती करण्यात आली आहे. त्यामध्ये मतदान केंद्र क्र. ३८ - खाऱ्या दोंदवाडा, मतदान केंद्र क्र. १०३ - आंबाफाटा, मतदान केंद्र क्र. १३८ - नवी सांगवी आणि मतदान केंद्र क्र. ३२८ - सावेर यांचा समावेश आहे.

प्रारूप मतदार यादी प्रसिद्ध झाल्यानंतर नागरिकांना दि. ३१ ऑगस्ट ते ३० सप्टेंबर २०२६ या कालावधीत दावे व हरकती दाखल करता येणार आहेत. प्राप्त दावे व हरकतींबाबत दि. ३१ ऑगस्ट ते २९ ऑक्टोबर २०२६ या कालावधीत नोटिसा देऊन सुनावणी घेऊन त्यांचा निपटारा करण्यात येणार आहे.एसआयआर-२०२६ ची सुधारित प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर अंतिम मतदार यादी दि. ४ नोव्हेंबर २०२६ रोजी प्रसिद्ध करण्यात येणार आहे. प्रांताधिकारी डॉ. शरद मंडलिक व तहसीलदार महेंद्र माळी यांनी मतदारांनी प्रारूप मतदार यादीत आपले नाव, पत्ता व इतर तपशील तपासून आवश्यक असल्यास विहित मुदतीत दावे अथवा हरकती दाखल करण्याचे आवाहन केले आहे.

## एसआरआर मध्ये फॉर्म नाही, डिजिटाइझेशन नसल्यामुळे

**तीस सप्टेंबरपर्यंत हरकत**

एसआयआरच्या प्रारूप मतदार यादीत नाव नसलेल्या मतदारांना आपले नाव पुन्हा समाविष्ट करण्यासाठी दावा दाखल करता येणार आहे. त्रासाठी तीस सप्टेंबर परंत संबंधित मतदारांना दावे किंवा हरकती नोंदविता येतील. यासाठी आवश्यक कागदपत्रांसह संबंधित अर्ज सादर करावा लागणार आहे. प्रारूप यादीत नाव नसल्याने संबंधित व्यक्तीचा मतदानाचा अधिकार तात्काळ संपुष्टात येत नाही. पात्र मतदारांना आपले नाव मतदार यादीत समाविष्ट करण्यासाठी नियमानुसार दावा दाखल करण्याची संधी देण्यात आली आहे.

**चार नोव्हेंबरला अंतिम मतदार यादी**

दावे आणि हरकती प्राप्त झाल्यानंतर त्यांची छाननी व निराकरणाची प्रक्रिया करण्यात येणार आहे. त्यानंतर तीस नोव्हेंबर २०२६ रोजी एसआयआरनंतरची अंतिम मतदार यादी प्रसिद्ध केली जाणार आहे. दरम्यान, मतदारांनी प्रारूप यादीत आपले नाव आहे की नाही, याची तपासणी करावी. नाव आढळून न आल्यास निर्धारित मुदतीत आवश्यक कागदपत्रांसह दावा दाखल करून नावाचा मतदार यादीत समावेश करून घेता येणार आहे.

## साक्रीत रस्त्यांसाठी उपोषणकर्त्यांचे जेलभरो

तिसऱ्या दिवशीही विविध राजकीय पक्ष,सामाजिक संघटना आणि सर्वसामान्य नागरिकांनी आंदोलनस्थळी उपस्थित राहून पाठिंबा दर्शविला.

दरम्यान,किमान ठोस निर्णय होईपर्यंत आंदोलन सुरू ठेवण्याची भूमिका उपोषणकर्त्यांनी घेतली होती.आंदोलनाचे पडसाद तालुक्यात उमटत असल्याचे चित्र पाहून सार्वजनिक बांधकाम विभागाच्या वरिष्ठ पातळीवर अधिकाऱ्यांशी चर्चा करून उपोषणस्थळी भेट दिली.

यावेळी चर्चेसाठी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधीक्षक अभियंता विनोद भदाणे,साक्री पंचायत समितीचे उपअभियंता महेंद्र खामकर,प्रधानमंत्री ग्राम सडक योजनेचे उप अभियंता श्री येळाई,तहसीलदार साहेबराव सोनवणे, उपविभागीय पोलीस अधिकारी सुधीर पाटील यांच्यासह इतर शासकीय अधिकारी उपस्थित होते. तालुक्यातील संबंधित अभियंत्यांनी आंदोलन करत्यांशी चर्चा करून रस्त्यांच्या दुरुस्तीबाबत स्पष्ट व लेखी आश्वासन द्यावे,अशी मागणी अॅड.युवराज तोरवणे यांनी केली.

या आंदोलनाला कोणतेही राजकीय स्वरूप देण्यात येऊ नये,याबाबतही आंदोलन करत्यांनी स्पष्ट भूमिका घेतली होती. आंदोलनाच्या व्यासपीठावर कोणत्याही राजकीय लोकप्रतिनिधी अथवा त्यांच्या कार्यकर्त्यांनी राजकीय जोडे बाहेर काढून आंदोलनात सहभागी होण्याचे आवाहन अॅड.तोरवणे यांनी केले. हे आंदोलन कोणत्याही राजकीय हेतूने नसून सर्वसामान्य जनतेच्या हितासाठी व तालुक्यातील रस्त्यांच्या प्रश्नाच्या सोडवणुकीसाठी असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

तालुक्यातील जनतेने मोठ्या संख्येने आंदोलनात सहभाग घेतल्याने रस्त्यांचा प्रश्न लवकरच मार्गी लागेल, असा विश्वासही आंदोलनकर्त्यांनी व्यक्त केला. मात्र,प्रशासनाकडून ठोस निर्णय व लेखी आश्वासन मिळेपर्यंत आंदोलनाची तीव्रता कायम ठेवण्यात येईल,असा इशारा देण्यात आला होता.

**जेल भरो आंदोलन**

बारा वाजेच्या सुमारास ड.युवराज तोरवणे यांच्या नेतृत्वाखाली सुरू असलेले उपोषण करत्यांनी तहसील कार्यालय परिसरातून साक्री पोलीस ठाण्याकडे मुकमोर्चा काढून जेलभरो आंदोलन केले.यावेळी शेकडो आंदोलक सहभागी झाले होते. आंदोलनकर्त्यांनी पोलीस ठाण्यात शांततेत जाऊन अटक करून घेत आपल्या मागण्यांकडे प्रशासनाचे लक्ष वेधून घेतले.

या आंदोलनात २२ आंदोलकां विरोधात साक्री पोलीस ठाण्यात कारवाई करण्यात आली.ठोस निर्णय आणि रस्ते,पुल दुरुस्तीबाबत स्पष्ट लेखी आश्वासन मिळत नाही तोपर्यंत आंदोलन मागे घेतले जाणार नाही.अशी ठाम भूमिका आंदोलनकर्त्यांनी घेतली आहे.आंदोलनस्थळी कायदा सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये.यासाठी पोलीस प्रशासनाने बंदोबस्तासाठी फौज फाटा लावण्यात आला होता. दुपारी २ वाजेच्या सुमारास सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधिक्षक अभियंता विनोद भदाणे यांनी लेखी आश्वासन दिल्याने अॅड. युवराज तोरवणे यांनी अधिकाऱ्यांच्या हस्ते उपोषण सोडण्यात आले.त्यांच्यावर साक्री ग्रामीण रुग्णालय येथे तपासणी करून प्राथमिक उपचार करण्यात आले. यावेळी डॉ. कुवर यांनी उपचार केले.

## ग.स. बँक निवडणूकीत सर्व जागांवर

निवड बिनविरोध झाली. त्यात ओबीसी प्रवर्गातून शंशाक विश्वास रंधे, भटक्या विमुक्त जाती-जमाती प्रवर्गातून योगेश धात्रक, अनुसूचित जाती-जमाती प्रवर्गातून शंकर वसावे, सर्वसाधारण प्रवर्गातील नाशिक जिल्ह्याच्या जागेवर लक्ष्मण देसले आणि अहिल्यानगर जिल्ह्यातील सर्वसाधारण जागेवर संदीप रेळवंडे यांची बिनविरोध निवड झाली आहे. विधकांना जळगाव आणि धुळे जिल्ह्यात सर्वसाधारण गटाच्या जागेवर आणि महिला राखीव असलेल्या एका जागेवर उमेदवार देता आले होते. प्रचाराच्या अंतिम टप्प्यात विरोधक फारसा प्रभाव पाडू शकले नाहीत. त्यामुळे मतदान आणि मतमोजणी प्रक्रिया पार पडणे, हा केवळ सोपस्काराचा भाग ठरला होता. धुळ्यातील अग्रवाल विश्राम भवनाच्या आवारात सोमवारी सकाळी आठला मतमोजणीस सुरूवात झाली. दुपारी निकाल जाहीर झाले. त्यात सर्व जागा लोकमान्य पॅनलला मिळाल्या. निवडणूकीत विजयी झालेल्या उमेदवारात प्रशांत बोरसे (२८०८), प्रवीण भदाणे (२८२६), दीपक सयाजीराव आहेर (२७१८), बिपीनचंद्र सोनवणे (२७६३), विजरकुरार राळी(२७४७), अरोल शिंदे (२७४७), बापूराव पाटील (२७४१), ररुर पवार (२७३३), प्रकाश बच्छाव २७२३), देवेंद्र बोरसे (२७२१), दीपक निकर (२७१८), आनंदराव करनकाळ (२७११), वैभव सोनवणे (२७०९), सोनाली भाररे (३०५२), कविता रोरे (२९१५) रांचा सरावेश आहे. रा निवडणूकीत कविता शिंदे (२४७), रविंद्र देवरे (३५४) आणि राहुल सोनवणे (१४८), हे पराभूत झाले.

पान १ वरुन

## अनाथ मुलांना मुख्य प्रवाहात आणणाऱ्या

जाणून घेऊन त्या सोडविण्यासाठी सातत्याने काम केले. महिलांना त्यांच्या हक्कांची जाणीव करून देणे, त्यांच्या अडचणी समजून घेणे आणि संबंधित पातळीवर पाठपुरावा करून समस्यांचे निराकरण करण्यासाठी त्यांनी पुढाकार घेतला.

वंदना तोरवणे यांनी अखिल भारतीय ग्राहक पंचायत समितीच्या जिल्हाध्यक्षपदाची जबाबदारीही सांभाळली आहे. या माध्यमातूनही त्यांनी नागरिकांच्या आणि विशेषतः महिलांच्या विविध प्रश्नांवर काम केले.

दुर्गम आदिवासी भागातील महिला, अनाथ आणि वंचित मुला-मुलींसाठी त्यांनी केलेल्या उल्लेखनीय सामाजिक कार्याची दखल घेत महाराष्ट्र शासनाच्या महिला व बाल विकास विभागाने सन २०२२-२३ साठी त्यांची पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर पुरस्कारासाठी निवड केली आहे.

या पुरस्कारामुळे वंदना तोरवणे यांच्या दीर्घकाळच्या सामाजिक कार्याचा गौरव झाला आहे. अनाथ मुला-मुलींना शिक्षणाची संधी देऊन त्यांना मुख्य प्रवाहात आणण्याबरोबरच उच्च शिक्षणासाठी त्यांना प्रोत्साहन देत स्वावलंबी बनविण्याच्या त्यांच्या प्रयत्नांचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे.

## ग्रा.पं.अधिकारी व सरपंचांबाबत रील्स

खातरजमा न करता केवळ प्रसिद्धीसाठी चुकीच्या माहितीवर आधारित रील्स तयार करून प्रसारित करीत आहेत. त्यामुळे गावागावात गैरसमज व वादाचे वातावरण निर्माण होत असून, त्याचा थेट परिणाम ग्रामपंचायत अधिकारी व सरपंच यांच्या कामकाजावर होत असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

निवेदनात जळगाव जिल्ह्यातील पारोळा तालुक्यातील शिवरे गावातील घटनेचा संदर्भ देण्यात आला असून, चुकीच्या सोशल मीडिया प्रसारणामुळे ग्रामपंचायत अधिकारी पी. एन. पाटील यांना मानसिक त्रास सहन करावा लागल्याचा दावा करण्यात आला आहे. अशा प्रकारच्या घटनांमुळे संबंधित व्यक्ती तसेच त्यांच्या कुटुंबीयांवर गंभीर परिणाम होऊ शकतो, अशी चिंता व्यक्त करण्यात आली आहे.

लोकशाहीमध्ये प्रत्येकाला अभिव्यक्ती स्वातंत्र्य असले तरी त्याचा गैरवापर करून एखाद्या व्यक्तीची बदनामी करणे किंवा खोटी माहिती प्रसारित करणे योग्य नाही. त्यामुळे खोटी माहिती व चुकीच्या रील्स प्रसारित करणारे ग्रुप अॅडमिन तसेच संबंधित व्यक्तींवर कायदेशीर कारवाई करावी, अशी मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

तसेच गावागावात कायदा व सुव्यवस्था अबाधित राहण्यासाठी पोलिसांनी अशा प्रकारच्या सोशल मीडिया पोस्ट व रील्सवर लक्ष ठेवून दोषींवर कारवाई करावी, अशी मागणी नवापूर तालुक्यातील सरपंचांनी केली आहे.निवेदनावर सरपंच नंदुरबार युनियनचे अध्यक्ष राहुल गावीत,तालुका सरपंच परिषद अध्यक्ष सरपंच दिलीप गावीत,तालुका उपाध्यक्ष अविनाश गावीत,कोषाध्यक्ष जयराम कुंवर,कार्यध्यक्ष जयवंत पाडवी,प्रशात नाईक,विपुल वळवी,प्रियंका गावीत,अनिता नाईक,सफिरा गावीत सह सरपंच यांच्या सह्या आहेत.



## गावठी कट्टा बाळगणारा तरूण गजाआड

**धुळे, दि.३१- गावठी कट्टा व जिवंत काडतूस बाळगणाऱ्या साक्री रोड परिसरातील तरुणास स्थानिक गुन्हा अन्वेषण शाखेच्या पोलीस पथकाने वलवाडी शिवारात पकडले. पिस्तूलसह ४१ हजारांचा मुद्देमाल जप्त केला असून पश्चिम देवपूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला.**

त्याअनुषंगाने स्थानिक गुन्हा अन्वेषण शाखेचे पोलीस निरीक्षक ज्ञानेश्वर वारे यांना गोपनिय माहिती मिळाली. त्यानुसार वलवाडी जय संतोषी माता कॉलनी, धुळे येथील नदी किनारी पुलाजवळ मंजूर शाह डबु शाह, (वय ३६, रा. गवळी वाडा, जामा मशिद मागे, मोगलाई) याला ताब्यात घेतले. चौकशीअंती दहशत माजविण्याचे उद्देशाने विना परवाना एक गावठी कट्टा (पिस्टल), जिवंत राऊंड बेकायदेशीररित्या कब्जात बाळगल्याचे आढळले.

त्याच्याकडून ४० हजार रुपयांचा एक देशी गावठी कट्टा (पिस्टल) मॅग्झीनसह, एक जिवंत काडतुस, असा एकुण ४१ हजार रुपयांचा मुद्देमाल हस्तगत केला. मंजूर शाह यास विना परवाना गावठी कट्टा, जिवंत राऊंडसह ताब्यात घेवून पश्चिम देवपूर पोलीसांच्या स्वाधीन केले. शस्त्र अधिनियम कलमानुसार गुन्हा दाखल झाला.

**वर्षभरापूर्वी शस्त्र खरेदी**

संशयित मंजूर शाह याची पोलिसांनी कसून चौकशी केली. चौकशीत त्याने एक ते दिड वर्षापुर्वी उमर्टी (म.प्रदेश) येथून शस्त्र खरेदी केल्याची कबुली दिली. पोलीस अधीक्षक विशाल आनंद, अपर पोलीस अधीक्षक अजय देवरे यांचे मार्गदर्शनाखाली निरीक्षक ज्ञानेश्वर वारे, सहाय्यक निरीक्षक दीपक ढोके, हवालदार राहुल सानप, शिरीष भदाणे, प्रकाश सोनार, संदीप पाटील, देवेंद्र ठाकुर, आशिषकुमार वानखेडे यांनी कारवाई केली.

**निधन वार्ता**

## मधुकर विसपूते

शहादा,दि.३१- येथील अहिर सुवर्णकार समाजाचे संस्थापक अध्यक्ष, नगरपरिषदेचे सेवानिवृत्त वसुली कर्मचारी मधुकर मंगूशेठ विसपुते यांचे अल्पशः आजाराने निधन झाले. मृत्यूसमयी ते ७६ वर्षांचे होते. त्यांच्या पश्चात दोन मुले, मुलगी, तीन भाऊ, जावई, नातवंडे असा परिवार आहे.



**पाहिजेत**
१) इंजिनिअर
२) सुपरवायझर
३) कार ड्रायव्हर/ हायवा ड्रायव्हर
४) JCB ऑपरेटर/ पोकलॅन ऑपरेटर
अनुभवी व निव्यर्सनी उमेदवारांनी
-: संपर्क :-
संजय पाटील
9765552556

**पाहिजेत**
१) मुली/महिला सेल्स Executive
२) मुली/महिला Exhibition Executive
३) मुली/महिला Retail Executive
फक्त मुली/महिलांना प्राधान्य दिले जाईल.
आपला Resume व आधार कार्ड सह भेट
वेळ- Manisha's food Product's shree hakur watch Company Agra road, Phoolwala chowk, Dhule

धुळ्यात 'प्लास्टो' आणी इतर सर्व नामांकित कंपनीच्या पाण्याच्या टाक्या आमच्याकडे होलसेल रेटमध्ये उपलब्ध आहेत..




१०० ते १०,००० लिटर पर्यंत गोल व चौरस टाक्या होलसेल रेट व हजर स्टॉक मध्ये उपलब्ध आहे.
धुळ्यात प्लास्टो कंपनीच्या टाक्या मिळण्याचे एकमेव ठिकाण...
**शंकर विजय सॉ मिल**
प्रकाश टॉकीज समोर, पारोळा रोड, धुळे.
फो. 9422285091

**पाहिजेत**
आयटीआय झालेला मुलगा शिकाऊ टर्नर, वेल्डर पाहिजे
संपर्क:- शाह इंजिनिअरिंग वर्ल्स अॅण्ड मशिनरी पार्टस् सुबानी मस्जिद बाजुला लोहा बाजार ८० फुटी रोड, धुळे
मो. 9403474944
9423474740

**WANTED**
La Pino'z Pizza
* पदे :
* किचन स्टाफ
* कॅशियर
इच्छुक उमेदवारांनी Resume सोबत घेऊन प्रत्यक्ष भेट द्यावी.
La Pino'z Pizza
नेहरू नगर, वाडीभोकर रोड, देवपूर, धुळे.
संपर्क / Whats-App : 8412058993

**विकणे आहे**
ऊस गल्ली मध्ये 13'X 55" जागा विकणे आहे.
-: संपर्क :-
7020469216

**पाहिजेत**
कामासाठी पाहिजे
सेल्समन - २
सेल्सगर्ल - २
श्याम वॉच अॅण्ड गिफ्ट सेंटर
फुलवाला चौक, धुळे
7219036785
9960777594

**भाड्याने देणे**
10X 16 चे गाळा रोड टच भाड्याने देणे आहे.
वाडीभोकर रोड, नेहरू नगर, देवपूर, धुळे
-: संपर्क :-
9545825692

**पाहिजेत**
पेट्रोल पंपावर कामासाठी मुले पाहिजे
-: समक्ष भेटा :-
सुपर सर्वोसेंटर इंडियन ऑईल पंप
पांझरा पोळ समोर, पारोळा रोड, धुळे

**पाहिजेत**
कारागिर, वेटर व हेल्पर लावणे आहे.
-: संपर्क :-
9022803196
8805589555

५९ वर्षांपासुन धुळेकरांच्या विश्वासाला पात्र ठरलेले...
Authorised Dealer
Godrej
LG Life's Good
सर्व आधुनिक व लेटेस्ट मॉडेल
JAPAN PREMIUM



0% फायनान्सची सुलभ E.M.I सुविधा उपलब्ध.
BAJAJ FINSERV
HDB FINANCIAL SERVICES
*नियम व अटी लागू
**श्री महावीर इलेक्ट्रीक अॅण्ड टी.व्ही.**
श्रीराम मंदिराजवळ, फुलवाला चौक, आग्रा रोड, धुळे, फोनः (02562) 229162, 235763

हे पत्र संपादक, मालक, प्रकाशक, हेमंत सुधाकर मदाने यांनी हेमंत प्रिंटींग प्रेस, वीर सावरकर मार्ग, धुळे येथे मुद्रित करून आपला महाराष्ट्र, जनशक्ती, वीर सावरकर मार्ग, धुळे-४२४००१ येथे प्रकाशित केले. दुरध्वनी मुख्य कार्यालय, धुळे (०२५६२) २३५३९६, २३८३९६, aplamaha@gmail.com नंदुरबार २२३४४४ aplamahashd@gmail.com शहादा-२५६९३९, मालेगाव-२४३१३३६, नाशिक-२५७५९८९, पुणे-९८२३०४६५२२, आपला महाराष्ट्र-रजि.नं.एम.एच.डी.आय.ए.१७ र.नं.११२२२/६०